मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०१७ • पृष्ठे १०० • किंमत १५ रुपये
• वर्ष सतरावे • अंक पाचवा

सुट्टीची धमाल !

आवर्जून वाचावे

फ्रंकलिन मालिका

आपली सृष्टी मालिका

एल्पर मालिका

विक्रम वेताळ मालिका

'बाजिंद'चे लेखक पै.गणेश मानुगडे यांच्याशी दिलखुलास गप्पा

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयात 'गप्पा 'बाजिंद'कारांशी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वाचकांनी 'बाजिंद'चे लेखक पै. गणेश मानुगडे यांच्याशी मुक्त संवाद साधला.या कादंबरीविषयी बोलताना ते म्हणाले, 'गडकोट मोहिमे दरम्यान एका धनगरवाड्यात पोचलो आणि तिथेच या कादंबरीची कल्पना सुचली. सोशल मीडियावर चांगला प्रतिसाद मिळतोय, हे पाहिल्यावर रात्री जागून 'बाजिंद' पूर्ण केली. या कादंबरीतून बहिर्जी नाईकांसारखं स्वराज्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर आणल्याचा आनंद वाटतो.' या कार्यक्रमात 'बाजिंद'चे अभिवाचन करण्यात आले. या कादंबरीच्या प्रकाशनाबद्दल त्यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसचे आभार मानले.

द. मा. मिरासदार यांचे ९१व्या वर्षात पदार्पण

समाजातल्या विरोधाभासाला चिमटीत पकडून त्यातली गंमत दाखवणारे आपले लाडके द.मा.मिरासदार यांनी ९१व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्तानं शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. टिळक स्मारक मंदिर इथं केंद्रीय शिक्षण मंत्री प्रकाश जावडेकर आणि पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे यावेळी पुष्पगुच्छ देऊन द.मां.चे अभीष्टचिंतन करण्यात आले. या समारंभाची ही काही क्षणचित्रे...

मेहता मराठी ग्रंथजगत

मे २०१७ वर्ष सतरावे अंक पाचवा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा
संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.
प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय ४
लेखक परिचय १२
उपक्रम १६

बालकथा

लटकू लटके - राजीव तांबे २८
रमा आणि गीता - रेणू गावस्कर ३४
वर्चस्व - मधुमती शिंदे ४२
आत्मघाती पृथ्वीकर - अनिल शिंदे ५०
चतुर पिठू - ना.द. जोशी ६०
खरे-खोटे - राजीव तांबे ६६
मजेदार लोककथा ७८
चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी ८२
ज्योतिषाचं नशीब आणि इतर कथा ८६
घरटे ९२
स्मरण ९४

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२

E-mail :
mmgj@mehtapublishinghouse.com

बालसाहित्याच्या विविध दालनांत एक फेरफटका

बालसाहित्य म्हणजे बालांसाठी लिहिलं गेलेलं साहित्य. बालसाहित्याचा विचार करताना कथा आणि कविता हे दोन आकृतिबंध प्राधान्याने समोर येतात. बालवाङ्मयात कादंबरी हा आकृतिबंध फार कमी हाताळला गेला आहे.

खरं तर कथा हा वाङ्मय प्रकार मौखिक परंपरेने चालत आलेला आहे. केवळ मराठीतच नव्हे तर अन्य भाषांतही कथेला मौखिक परंपरा असणार. टीव्ही चॅनल्सची, कॉम्प्युटर, मोबाईलवरील गेम्सची आताइतकी रेलचेल नव्हती तेव्हा, लहान मुलांना स्पर्धानामक प्रकाराला तोंड द्यावं लागत नव्हतं तेव्हा आणि लहान मुलं एकत्र कुटुंबात वाढत होती तेव्हा गोष्ट ऐकणे हा मुलांचा आवडता छंद होता. (आजही मुलांना गोष्टी ऐकायला आवडतात. त्यासाठी दूरदर्शनच्या विविध वाहिन्या, ऑडिओ-व्हिडिओ सीडीजसारखी माध्यमं उपलब्ध आहेत; पण तेवढा वेळ या मुलांकडे नसतो आणि आजीच्या कुशीत झोपून तिच्याकडून कथा ऐकण्याचा जो आनंद मिळतो तो वेगळाच असतो.)

कथा केवळ मनोरंजनासाठी सांगितल्या जात असल्या तरी मराठीतील कथांचं स्वरूप पाहता मुलांवर चांगले संस्कार होतील, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल, अशी क्षमता त्या कथांमध्ये आहे. कोवळ्या वयातच चार चांगल्या गोष्टी मुलांच्या कानावर पडल्या तर पुढे जाऊन ती एक चांगला माणूस बनतील, ही एक धारणाही लहान मुलांना कथा सांगण्यामागे होती. या कथांमधील आशयात व्यक्तिमत्त्व विकासाची बीजं

आहेत. त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेगळा क्लास लावण्याची गरज उरणार नाही. बुद्ध्यांक (आयक्यू) आणि भावनांक (ईक्यू) विकसित करण्याची क्षमता या कथांमध्ये आहे.

मराठी बालसाहित्यातील कथेचं दालन समृद्ध करण्यात ना. धों. ताम्हनकर (मणि,निलांगी,चिंगी, गोट्या इ.), वि. वि. बोकील (वसंता, साडेतीन शहाणे इ.), भा. रा. भागवत (फास्टर फेणे संच (१ ते २०), असे लढले गांधीजी, इ.), लीलावती भागवत (पाच कथासंग्रहांचा संच इ.), साने गुरुजी (अनमोल गोष्टी, चित्रकार रंगा इ.), दुर्गा भागवत (बालजातक, लोककथा (बंगाल, गुजरात, पंजाब इ.), राजा मंगळवेढेकर (आनंदगोष्टी, बारकू, रॉबिनहूड इ.), सरिता पदकी (सात रंगांचा पूल, कशी केली फ इ.), रमेश मुधोळकर (गणपतीच्या गोष्टी, बोलका शंख, बिरबल आणि बादशहाच्या १७५ गोष्टी इ.), प्रकाश संत (लंपन या मुलाचा बाल्यावस्थेपासून पौगंडावस्थेपर्यंतचा भावप्रवास चितारणारी 'शारदा संगीत', 'पंखा', 'झुंबर' ही पुस्तकं), मालती दांडेकर (देशोदेशीच्या परीकथा) इ. लेखकांचं योगदान मोलाचं आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या व्यक्तींची चरित्रं कथारूपाने बालांसमोर आणण्याचं कामही काही लेखकांनी केलं आहे. उदा. डॉ. प्र. न. जोशी (१४ थोर पुरुषांच्या अद्‌भुत कथा), रुचा थत्ते (५० असामान्य भारतीय). तर कथेचं हे दालन अद्‌भुत,साहस, चरित्रकथा, संस्कार कथा इ. विविध प्रकारच्या कथांनी संपन्न आहे.

बालगीतांच्या दालनात पाठ्यपुस्तकातील कविता, ध्वनिमुद्रित झालेली आणि गाजलेली बालगीते, बडबडगीते यांचा समावेश होतो. 'ऊठ मुला, ऊठ मुला, बघ हा अरुणोदय झाला,' 'लाडकी बाहुली होती माझी एक,' 'टपटप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले,' 'या बालांनो या रे या' यांसारख्या लयबद्ध कविता आठवतात. 'पडु आजारी मौज वाटे भारी' ही कविता एका आजोबांना आपल्या नातवाला ऐकविण्यासाठी हवी होती आणि त्या शोधातून शालेय कवितांचं संकलन असलेले 'आठवणींच्या कवितांचे' चार खंड प्रकाशित झाले. पद्‌माकर महाजन, दिनकर बरवे, रमेश तेंडुलकर, राम पटवर्धन यांनी त्या चारही भागांचं संपादन केलं आहे.

याशिवाय सरिता पदकी यांचा 'खुळूऽऽक्' हा बालगीतांचा संग्रह, लीलावती भागवतांचा 'कुडकुड थंडी' हा अंगणवाडी व बालवाडीसाठी बडबडगीतांचा संच, तसेच रत्नाकर मतकरींचं 'गाऊ गाणे गमतीचे' हे त्यांच्याच बालनाट्यांतील गाण्यांचं संकलन इ.पुस्तकांनी बालकवितांचं/बालगीतांचं दालन समृद्ध आहे. ध्वनिमुद्रित बालगीतं हा आनंदाचा एक ठेवा आहे. मंगेश पाडगावकर यांची 'टपटप थेंब वाजती, गाणे गातो वारा', 'सांग सांग भोलानाथ', शांता शेळके यांची 'आई, बघ ना कसा हा दादा,' 'किलबिल किलबिल पक्षी बोलती,' 'खोडी माझी काढाल तर' ही गीतं, शांताराम नांदगावकरांचं 'दोन बोक्यांनी आणला हो आणला', राजा मंगळवेढेकरांची 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला,' 'कोणास ठाऊक कसा' इ. ध्वनिमुद्रित बालगीतं बालांबरोबरच मोठ्यांनाही रिझवतात. याखेरीज ग. दि. माडगूळकरांनी चित्रपटांसाठी लिहिलेली 'चंदाराणी, चंदाराणी, का ग दिसतेस थकल्यावाणी' किंवा 'शेपटीवाल्या प्राण्यांची मोठी भरली सभा' किंवा 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात' यासारखी बालगीतंही या दालनात समाविष्ट करता येऊ शकतात.

बालनाट्याच्या दालनात डोकावल्यावर रत्नाकर मतकरींची 'चमत्कार झालाच पाहिजे', 'सरदार फाकडोजी वाकडे' आणि 'चटकदार ५+१' इ. बालनाटकं, तसेच कविता मेहेंदळे लिखित '११ नाट्यछटा', राजीव जोशी यांनी लिहिलेल्या '७३ शालेय नाट्यछटा', सौ. वृंदा कुलकर्णी लिखित '११ बालनाटिका' इ. बरीच पुस्तके आढळतात. कादंबरी विभागात अपरिहार्यतेने आठवते साने गुरुजींची 'श्यामची आई' ही कादंबरी. 'ब्रह्मदेशातला खजिना' ही भा. रा. भागवतांनी बालांसाठी लिहिलेली कादंबरी आहे. सुनीती नामजोशी यांची 'अदितीची साहसी सफर' ही बालांसाठी लिहिली गेलेली आणखी एक कादंबरी.

'किशोर' हे मासिक आणि विविध भारतीय भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या 'चांदोबा' या कॉमिक्सने त्या त्या बाल पिढीला बौद्धिक आणि मानसिक आनंद दिला.

बालसाहित्याच्या या दालनांमध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने मोलाची भर घातली आहे. वृषाली पटवर्धन (चतुर बोकोबा आणि इतर कथा,

नशीबवान शेखर आणि इतर कथा , एल्मर ही अनुवादित मालिका इ.), चारुता पुराणिक (हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या इ.), मंजूषा आमडेकर (सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी, आदर्श लोककथा, 'फ्रँकलिन' कासवाच्या बोधपर गोष्टींची अनुवादित मालिका), अर्चना ओक (बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी इ.), उमा खरे (गंपू चिंपू आणि इतर कथा इ.), उज्ज्वला केळकर (बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी इ.) याखेरीज राजीव तांबे लिखित ससोबा-हसोबा मालिका, छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी, शरद दळवी लिखित जंगल कथा, वैशाली कार्लेकर, निर्मला मोने आणि अरुंधती महाम्बरे लिखित 'जंगल जंमत मालिका,' प्राचार्य डॉ. किशोर पवार व प्रा. सौ. नलिनी पवार लिखित 'आपली सृष्टी' ही दहा पुस्तकांची मालिका, डॉ. बाळ फोंडके लिखित सहा विविध विषयांवरील आगळावेगळा संच इ. विविध प्रकारच्या बालसाहित्याने मेहता पब्लिशिंग हाऊसचं बालसाहित्याचं दालन समृद्ध आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या बालसाहित्यास अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. २००५-२००६मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसच्या रंगीत पुस्तकांच्या खास उपक्रमास अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा प्रथम निर्मिती पुरस्कार मिळाला. 'छत्रीची जादू आणि इतर कथा' या राजीव तांबे यांच्या ससोबा-हसोबा मालिकेतील पुस्तकास २००८-२००९मध्ये महाराष्ट्र राज्य शासनाचा कवी दत्त पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'जंगल जंमत' मालिकेतील 'बूम बूम बैल आणि जंमत गोष्टी' या अरुंधती महाम्बरे लिखित पुस्तकास २००९-२०१०मध्ये महाराष्ट्र राज्य शासनाचा साने गुरुजी पुरस्कार मिळाला. 'खुलदाबादचा खजिना' या मीरा सिरसमकर लिखित पुस्तकास २०१३मध्ये मराठी बालकुमार सभा, कोल्हापूर आणि अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्था - कार्ले गुरुजी पुरस्कार प्राप्त झाला. तसेच २०१६च्या बाल-वाङ्मयासाठीच्या साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी राजीव तांबे ठरले. मधुमती शिंदे यांनी लिहिलेल्या 'दोस्ती' या पुस्तकाने २०१५-१६मध्ये चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालय उत्कृष्ट बालवाङ्मय पुरस्कार पटकावला, तर याच पुस्तकासाठी

मेहता पब्लिशिंग हाऊसला २०१६मध्ये 'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' तर्फे उत्कृष्ट पुस्तक निर्मितीसाठी प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. तेव्हा बालसाहित्य निर्मितीत मेहता पब्लिशिंग हाऊसचंही मोलाचं योगदान आहे.

मुलांना अद्‌भुत विश्वात घेऊन जाणं, त्यांच्यासमोर आदर्श ठेवणं, त्यांच्या बुद्धीला चालना देणं, त्यांच्यावर चांगले संस्कार करणं हेच नेहमी बालसाहित्य निर्मितीचं प्रयोजन राहिलं आहे. मराठी बालसाहित्याच्या या विविध दालनांत कथांचं दालन विविध प्रकारच्या कथांनी समृद्ध आहे. बालसाहित्याचं आणखी एक वैशिष्ट्यं म्हणजे बालसाहित्यासाठी चितारली गेलेली चित्रं. या बोलक्या आणि आकर्षक चित्रांसाठी चित्रकारांचंही (आर्टिस्ट) ऋण मान्य करावं लागतं. बाल साहित्य संमेलनाच्या निमित्ताने बालसाहित्य विषयक अनेक पैलूंवर विचारमंथन होत असेलही; पण बालसाहित्य संमेलनाचा फारसा गाजावाजा होताना दिसत नाही.

काही साहित्यिकांनी जाणीवपूर्वक बालसाहित्याचा मार्ग चोखाळला, तर काहींच्या हातून नकळतपणे बालसाहित्य लिहिलं गेलं. तेव्हा या सर्व बाल साहित्यिकांचं योगदान निश्चितच महत्त्वाचं आहे. बालसाहित्याचं हे दालन असंच समृद्ध होत राहो, ही अपेक्षा आणि सदिच्छा आहेच; पण आतापर्यंत जे साहित्य बालांसाठी निर्माण झालं ते आजच्या बाल पिढीला घडविण्यासाठी, कसं उपयुक्त आहे, याचाही धांडोळा घेणं आवश्यक आहे. वाचन हे केवळ मनोरंजनासाठी नाही, तर व्यक्तिमत्त्व विकासासाठी कसं उपयोगी आहे, या दृष्टिकोनातून मुलांना वाचायला प्रवृत्त केलं पाहिजे. तरच हे साहित्य खऱ्या अर्थाने मुलांपर्यंत पोहोचलं, असं म्हणता येईल.

सुनीलपेडा

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३५० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ५०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. - जी/१५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon dailyhunt Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.com

m.dailyhunt.in

play.google.com

eBooks

Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

लेखक परिचय

– राजीव तांबे

राजीव तांबे हे बालक-पालक आणि शिक्षक यांच्यासाठी विविध प्रकारे योगदान देणारं एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. ते केवळ बालसाहित्यिक नाहीत तर बालक-पालक आणि शिक्षकांसाठी निष्ठेने, सजगतेने आणि सातत्याने काम करत आहेत. मुले, पालक व शिक्षकांसाठी त्यांनी देशात आणि विदेशांतही अनेक कार्यशाळा घेतल्या आहेत. युनिसेफचे शैक्षणिक सल्लागार, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे सदस्य, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आढावा समितीचे सदस्य म्हणून शिक्षण क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. देशात आणि परदेशांत अनेक परिषदांमधून त्यांनी पेपर्सचं वाचन केलं आहे. 'गंमतशाळा' ही संकल्पना मांडून प्रत्यक्षात तिचं रूपांतर एका हृद्य चळवळीत करण्याचं श्रेय त्यांच्याकडेच जातं. 'एबीपी माझा' या वाहिनीवर सलग दोन वर्षं त्यांनी पालकांसाठी 'मुलांच्या विश्वात' हा लाइव्ह कार्यक्रम सादर केला. मुलांसाठी इंग्रजी, मराठी गाणी आणि गोष्टींच्या कॅसेट्सची निर्मिती त्यांनी केली आहे. २०१३मध्ये ऑस्ट्रेलियात सिडनी इथे पार पडलेल्या कालिदास साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषविलं आाहे. युनिसेफसाठी आणि इतर स्वयंसेवी संस्थांसाठी शैक्षणिक सल्लागार म्हणून काम करताना त्यांनी अनेक शाळांना भेट देऊन तेथील शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतल्या. यामध्ये दुर्गम भागातील शाळांचाही समावेश होता. त्यांच्या बालसाहित्यातील योगदानासाठी २०१६च्या साहित्य अकादमी पुरस्कारासह त्यांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. तसंच त्यांचे काही कथासंग्रह, एकांकिका, कवितासंग्रह, कादंबरी, शैक्षणिक पुस्तकं यांनाही राज्यस्तरीय आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेसह विविध संस्थांचे पुरस्कार लाभले आहेत. वृत्तपत्रांतूनही त्यांचे स्तंभलेखन सातत्याने सुरू असते.

तर अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने मेहता पब्लिशिंगच्या बाल-

साहित्याच्या दालनात मोलाची भर घातली आहे. 'ससोबा-हसोबा' ही सहा पुस्तकांची मालिका आणि 'छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी' ही चार पुस्तकांची मालिका त्यांनी मेहता पब्लिशिंग हाऊससाठी लिहिली आहे. या दोन्हीही मालिकांमधील कथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'ससोबा-हसोबा' मालिकेतील ससोबा, हसोबा, ससोबाची आई, त्याचे बाबा आणि अन्य प्राणी यांच्याभोवती या कथा फिरतात. छोट्याशा कथेतही एक संकटरूपी क्लायमॅक्स येतो आणि मग ससोबा त्यातून बाहेर पडतो, असा या कथांचा आकृतिबंध आहे. यातील प्राण्यांची स्वभाववैशिष्ट्यं (विशेषत: ससोबाचा थोडासा धांदरटपणा) या कथांमध्ये रंग भरतात. प्राण्यांच्या भावविश्वाचं दर्शन या कथा घडवतात.

'छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी' या मालिकेची कल्पना तर अभिनवच म्हणावी लागेल. एक नवजात बालिका आपलं मनोगत व्यक्त करतेय, ही या मालिकेची संकल्पना. जिला जन्माला येऊन जेमतेम काही दिवस झालेत, अशा बालिकेचं भावविश्व कल्पनेने शब्दबद्ध करणं, ही अवघड गोष्ट आहे; पण तांबे सरांनी ती लीलया पार पाडली आहे. ही मालिका वाचून तांबे सरांच्या कल्पकतेला आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीला दाद दिल्याशिवाय राहवत नाही. बब्बडच्या भावविश्वात डोकावणं, हा फार आनंददायक अनुभव आहे.

मुळातच बालसाहित्य निर्मितीसाठी तीव्र कल्पनाशक्तीची, सूक्ष्म निरीक्षण शक्तीची गरज असते. बालांची विविध वयोगटांतील मानसिकता लक्षात घ्यावी लागते. तांबे सर सदैव बालक-पालक शिक्षकांच्या संपर्कात असल्यामुळे ही मानसिकता त्यांना जवळून अनुभवता येते. त्यांच्या कथांतून बालमनाच्या हळुवारपणाची, निरागसतेची एक प्रसन्न झुळुक अनुभवायला मिळते. साध्या, सोप्या, ओघवत्या भाषेमुळे कथा आस्वाद्य होते. नर्म विनोदाच्या थोड्याशा शिडकाव्याने या कथांमध्ये रंगत येते. एका छोट्याशा कथेत येवढा सगळा परिणाम तांबे सर साधतात. आमच्या या बालसाहित्य विशेषांकात समाविष्ट केलेल्या त्यांच्या 'लटकू लटके' या कथेत त्यांनी फुलांना बोलतं केलंय आणि 'खरे व खोटे'मध्ये दागिन्यांना बोलतं केलंय. 'खरे आणि खोटे'मधील नीताची आई काय म्हणाली असेल, याचा अंदाज आमचे बालदोस्त नक्कीच लावतील.

बालसाहित्यात कादंबरी, कविता, एकांकिका, कथा (विज्ञानकथा, विज्ञान प्रयोग कथा, प्राणिकथा), शैक्षणिक लेखन असे विविध आकृतिबंध त्यांनी हाताळले आहेत आणि या प्रत्येक आकृतिबंधातून मुलांशी, पालकांशी, शिक्षकांशी मुक्त संवाद साधला आहे. तर मुलांच्या जडणघडणीसाठी समर्पित असलेल्या तांबे सरांना मेहता पब्लिशिंग हाऊसकडून पुढच्या वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा! असेच कार्यरत राहा! लिहित राहा!



– डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

ज्ञानपोई माझी शाळा

माझी शाळा, माझी शाळा, अशी माझी शाळा ।
माता-पिता, गुरु, बंधू, मित्र माझी शाळा ।।धृ.।।
नाचा, खेळा, गिरवा धडे, रोज नवे शिका ।
झाडे जगवा, झाडे लावा, प्राण्या-पक्ष्यांना सांभाळा।
मन ठेवा रे प्रसन्न, राहा निरोगी सुदृढ।
स्वच्छता नि आनंदाचे धाम माझी शाळा ।।१।।

जात, धर्म, पंथ नाही; नाही भेद राव रंक ।
राष्ट्र माझे, विश्व माझे, शाळा देई शिकवण ।
सहली, क्रीडा, संमेलने, घडवती एक मन ।
प्रेम, माया, मानवतेचे धाम माझी शाळा ।।२।।

चाचण्या, परीक्षा, स्पर्धा, खेळ वाटे आम्हा ।
असो कितीही अवघड, सोपे होई आम्हा ।
तंबी, धाक, शिक्षा अवघा, गुरुप्रसादची आम्हा ।
पालखी ही विठोबाची, ज्ञानपोई शाळा ।।३।।

समस्त जीवित आणि नामशेष प्राणिसृष्टीतील प्राणी, पक्षी, जलचर आणि उभयचर प्राण्यांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेणारी चित्रमय सफर...

'आपली सृष्टी' १० पुस्तकांची मालिका

किंमत प्रत्येकी ₹ ११०

जलसम्राट मासे
अजब सर्पसृष्टी
उभयचरांचे अनोखे विश्व
आकाशसम्राट पक्षी
पाणथळीतले पक्षी
मनोरंजक सस्तन प्राणी
डायनोसॉरचे अद्‌भुत विश्व
अनोखी मत्स्यसृष्टी
अनोखे सस्तन प्राणी
सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग

प्राचार्य डॉ. किशोर पवार
प्रा. सौ. नलिनी पवार

eOveeJeMe<e

eOmeeceeepe keâeneleje le eueneJe~
Øemeiee DeKee[le JeeeÛele peeJe~~
- ßee meceLe jeceOeme mJeecee

✲ वाचकांसाठी सुवर्णसंधी ✲

करा मैत्री पुस्तकांशी
मेहता पब्लिशिंग हाऊस चा
नवीन उपक्रम
१६ मे ते १५ जून २०१७
दरम्यानचा दिनविशेष

DeeheuÙee uee[keÙee ueKekeâevee Jee DeveJeeOkeâevee MeYeÛÚe Ùee FceueJej hee"Jee.

authors@mehtapublishinghouse.com

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर

५०टक्क्यांपर्यंत सूट

१७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन

'नॉट अ पेनी मोअर नॉट अ पेनी लेस, आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद, रुसी मोदी - द मॅन हू ऑल्सो मेड स्टील, अकूपार, हितगुज – तणावयुगातील तरुण पिढीशी, अंकरहित शून्यांची बेरीज, टर्निंग पॉइंट, इट्स नॉट अबाऊट द बाइक, आपण आपले ताणतणाव : एक चिंतन, अक्षयपात्र, डेज् ऑफ गोल्ड ॲन्ड सीपिया, कथागुर्जरी, छावणी, नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य, रामायणातील पात्रवंदना, तत्त्वमसि, चला उठा कामाला लागा' पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ३४५५/-

१७ मे ते १९ मेपर्यंत

सवलत किंमत
१९९९/-

२९ मे - जागतिक शांतिदूत दिन

'मी मलाला, महात्मा गांधी आणि तीन माकडे, मोहनदास, Speeches of War & Peace, Speeches That Reshaped the World' पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १९८५/-

२९ मे ते ३१ मेपर्यंत

सवलत किंमत
११५१/-

४ जून - जागतिक बालशोषणविरोधी दिन

हरवलेले बालपण, झोंबी, खाली जमीन वर आकाश, वेस्टेड, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, बिलाँगिग, नेव्हर टु रिटर्न, ॲन आय फॉर ॲन आय, द काइट रनर, अ थाऊजंड स्प्लेन्डिड सन्स, डिनायल, द डायरी ऑफ मेरी बर्ग, वेदनेची फुले, मी मलाला.' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

सवलत किंमत १८९९/-

संचाची मूळ किंमत - ३४०५/-

४ जून ते ६ जूनपर्यंत

५ जून - जागतिक पर्यावरण दिन

'वसुंधरा, पर्यावरण प्रदूषण, वेध पर्यावरणाचा, 'आपली सृष्टी' या १० पुस्तकांचा संच, वायू प्रदूषण, विपुलाच सृष्टी, केल्याने होत आहे रे...' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

सवलत किंमत १२९९/-

संचाची मूळ किंमत - २११०/-

५ जून ते ८ जूनपर्यंत

५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन

'ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स' या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत

सवलत किंमत १९९/-

मूळ किंमत - ३००/-

५ जून ते ७ जूनपर्यंत

९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन

अॅज आय सी – स्त्रियांचे सक्षमीकरण, भारतीय पोलिस सेवा, नेतृत्व आणि प्रशासन, आय डेअर, बी द चेंज... भ्रष्टाचाराशी लढा, इट्स ऑलवेज पॉसिबल, मजल... दरमजल..., व्हॉट वेंट राँग अॅन्ड व्हाय' या **अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - १६८०/-

९ जून ते ११ जूनपर्यंत

सवलत किंमत
११४९/-

१२ जून - अॅन फ्रँक यांचा जन्मदिन

'डायरी ऑफ अॅन फ्रँक'या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २२०/-

१२ जून ते १४ जूनपर्यंत

सवलत किंमत
१५०/-

१२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन

'हरवलेले बालपण, आय एम अ टॅक्सी, खाली जमीन वर आकाश, शेम, वेदनेची फुले, सर्चिंग फॉर डॅडी ' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – १३२०/-

१२ जून ते १५ जूनपर्यंत

सवलत किंमत
७९९/-

१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन

भा. द. खेर लिखित 'चाणक्य, दिग्विजय' या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत – ७५०/-

१२ जून ते १४ जूनपर्यंत

सवलत किंमत
४९९/-

जानेवारी असो वा असो डिसेंबर
बारा महिने अनुभवा पुस्तकांचा बहर
महिन्यांच्या नावातलं निवडा आद्याक्षर
बारा महिने मिळवा दमदार ऑफर

MAY महिना विशेष

'M' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत
१२,०४०/-

संचाची मूळ किंमत - २४,०८०/-
१ मे ते ३१ मेपर्यंत

'A' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत
११,१००/-

संचाची मूळ किंमत - २२,२००/-
१ मे ते ३१ मेपर्यंत

'Y' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत
१४१७/-

संचाची मूळ किंमत - २,१८०/-
१ मे ते ३१ मेपर्यंत

वरीलप्रमाणे **'M', 'A', 'Y'** या सर्व आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचासाठी कमीत कमी **४००० रुपयांच्या नेट** खरेदीवर **३७.५०टक्क्यांची** सवलत. *एका पुस्तकाच्या दोन प्रती* मिळवा.

१ मे ते ३१ मेपर्यंत

J U N E महिना विशेष

'J' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ६,०१५/-
१ जून ते ३० जून
सवलत किंमत ४०१०/-

'U' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ३,६१५/-
१ जून ते ३० जून
सवलत किंमत २३५०/-

'N' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ८,१३०/-
१ जून ते ३० जून
सवलत किंमत ५४२०/-

'E' आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत - ५,९८०/-
१ जून ते ३० जून
सवलत किंमत ३८८७/-

वरीलप्रमाणे **'J'**, **'U'**, **'N'**, **'E'** या सर्व आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचासाठी कमीत कमी **३००० रुपयांच्या नेट** खरेदीवर **३७.५०टक्क्यांची** सवलत. *एका पुस्तकाच्या दोन प्रती* मिळवा.
१ जून ते ३० जूनपर्यंत

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.
अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**
website : www.mehtapublishinghouse.com

पंचतंत्र कथा

अनिल किणीकर / निर्मला मोने

मुलांसाठी मनोरंजक आणि संस्कारही करणाऱ्या पंचतंत्रातल्या सरस आणि सुरस गोष्टी!

मनोरंजक गोष्टी

बोधप्रद गोष्टी

एकत्रित संच किंमत
३०० रु.
पोस्टेज खर्च
५० रु.

रोचक गोष्टी

सुरस गोष्टी



प्रेरक गोष्टी

तेनालीराम मालिका

लेखिका - मंजूषा आमडेकर / किंमत प्रत्येकी रु. ६०/-

बुद्धिमान तेनालीराम / जगावेगळा तेनालीराम / चतुर तेनालीराम / न्यायप्रिय तेनालीराम / समयसूचक तेनालीराम / लाडका तेनालीराम प्रसंगावधानी तेनालीराम / निर्भय तेनालीराम / राज्याचे भूषण तेनालीराम / हजरजबाबी तेनालीराम / हुशार तेनालीराम / विनोदवीर तेनालीराम / मजेदार तेनालीराम / परोपकारी तेनालीराम



बालचमूंसाठी

चतुर आणि विनोदी तेनालीरामच्या

धमाल गोष्टींचा खजिना

लेखिका - मंजूषा आमडेकर



– डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

गाडी निघाली पुढती पुढती

वळत वळत धावे वळत वळत
वळत वळत ट्रेन वळत वळत ।।धृ।।
झाली परीक्षा सुट्या लागल्या ।
आंबे आइस्क्रीम काळ मजेचा ।
अभ्यासाची कटकट नाही ।
खेळायाची एकच घाई ।
नवे फ्रेन्ड आणि नवी शिबिरे ।
गाणे गोष्टी नाटक चित्रे ।
टँकांमध्ये डुंबून झाले ।
भेळपार्टीची मजाच रंगे ।
आजी-आजोबा बाबा-आई ।
हरती सारे, जिंकू आम्ही ।
सिग्नल पडला शिटी वाजली ।
वादळ वारे बेत मोडती ।
गाडी निघाली पुढती पुढती ।।१।।

ऊन तापले वीज कडाडे ।
सुट्ट्यांचेही बेत संपले ।
नवीन स्टँडर्ड नवी पुस्तके ।

नवीन शूज अन् नवी दप्तरे ।
अभ्यासाचे आता बघा रे
आई-बाबा सांगू लागले ।
पहिल्या दिवशी मित्र भेटले ।
नववर्षाचे गुज रंगले ।
रिक्षा, व्हॅना ड्रायव्हर मामा ।
घेऊन ओझे टिफीन आईचा ।
पाणी साठता सुटी शाळेला ।
सिग्नल पडला शिटी वाजली ।
टेस्ट होमवर्कची भीती वाटली ।
गाडी निघाली पुढती पुढती ।।२।।

सणोत्सवांची एकच गर्दी ।
ऊन-पाऊस लप्पाछप्पी ।
शाळा सुट्ट्या गंमत झाली ।
शिरा, मोदक, पुरणपोळी ।
खाऊची किती चंगळ झाली ।
इंद्रधनूना पाहून मोहून ।
होड्या सोडत गेलो रंगून ।
गणपतीबाप्पा गल्लोगल्ली ।
आराशींची शोभा न्यारी ।
बाल मंडळे अशी रंगली ।
सिग्नल पडला शिटी वाजली ।
अभ्यासाची तंबी बसली ।
गाडी निघाली पुढती पुढती ।।३।।

दसरा गेला दिवाळी आली ।
सरे परीक्षा सुटी लागली ।
लाडू, करंज्या माळ दिव्याची ।
नळे नि चक्रे फुलबाज्या परी ।
पिस्तुल टिकल्या लडी पेटती ।

भाऊबीजेची झाली तयारी ।
थाट मजेचा गमतीजमती ।
टक्कर होई ऊन-थंडीची ।
क्रीडा स्पर्धा अन् गॅदरिंगची ।
हासतखेळत मिरवायाची ।
सिग्नल पडला शिटी वाजली ।
अभ्यासाची तंबी मिळाली ।
गाडी निघाली पुढती पुढती ।।४।।

माकडटोपी स्वेटर घाला ।
ओठी हुडहुडी सॅक पाठीला ।
मैदानातील खेळ मजेचे ।
क्लासमध्ये नकोच जाणे ।
मम्मा, टीचर पाठी लागती ।
अभ्यासाला बळे बसविती ।
लग्न निघाले आत्या, मामाचे ।
अभ्यासाचे ढुम ढुम झाले ।
सिग्नल पडला शिटी वाजली ।
अभ्यासाला पप्पा दरडावुनी ।
गाडी निघाली पुढती पुढती ।।५।।

अभ्यासाची झाली घाई ।
टेस्ट नेमिल्या पाठोपाठी ।
क्लास स्कूलची एकच घाई ।
ओरल प्रोजेक्ट करा तयारी ।
अभ्यासामधी डुलकी येई ।
लिहा नि वाचा प्रॉब्लेम सोडवी ।
खेळायाला झाली घाई ।
सिग्नल पडला शिटी वाजली ।
झाली होळी, रंगपंचमी ।
गाडी निघाली पुढती पुढती ।।६।।

फ्रँकलिन

'फ्रँकलिन' कासवाच्या बोधपर

२९ पुस्तकांची मालिका आता मराठीत

मूळ लेखिका
पोलेत बूर्ज्वा

अनुवाद
मंजूषा आमडेकर

किंमत प्रत्येकी ५०रु.
एकत्रित पोस्टेज १००रु.

– राजीव तांबे

लटकू लटके

पावडरच्या डब्याला टेकून आरशात पाहात तो बसला होता.

मग हात-पाय ताणून आळस देत तो म्हणाला,''आमचं सारं आयुष्य या बायकांच्या मागे मागे फिरण्यात जातं.''

हे ऐकल्यावर त्याला हसत 'ते' म्हणाले, ''मागे फिरण्यात नव्हे तर मागे लटकण्यात जातं,'' असं म्हणायचं असेल तुम्हाला?''

तो सुवासिक हसत म्हणाला,''व्वा! अगदी बरोबर. पण तुम्ही कसं काय ओळखलंत?''

''अहो, आम्ही पण तुमच्या सारखेच ना? लटकू लटके, बिलकुल हटके!!''

तो फुसफुसला,''हो! पण तुम्ही असता दोघे. मी बिचारा एकटाच!''

''म्हणजे तुम्हाला काहीच माहीत नाही तर... अहो आम्ही जरी दोघे असलो तरी 'दोन डूल शेजारी तरी भेट नाही संसारी' अशी आमची अवस्था.''

हे ऐकल्यावर श्री. गजरेभाऊ चाटच पडले.

डूल म्हणाले, ''अहो एका जागी तुम्ही स्वस्थ बसावं आणि उगाच चुळबूळ करू नये म्हणून तुम्हाला म्हणे बायका पिना मारतात?''

''एकदम खरं! पण... ... अर्धंच खरं.!!''

डूल किणकिणले, ''आता हे काय?''

गजरा सैलावला. म्हणाला, ''या माणसांच्या बोलण्याला काही

ताळमेळ नाही! हे तुम्हाला कळलंय कधी?''

'अहो, आम्हाला कळणार नाही तर कुणाला कळणार? त्यांची प्रत्येक गोष्ट आम्ही त्यांच्याच कानाला लोंबकळत ऐकतो!''

''या बायका आम्हाला पिना टोचतात! पण काही शिकल्या सवरलेल्या बायका आमच्यात मोठ्या पिना खुपसतात आणि त्याला 'आकडा' म्हणतात!! खरं सांगतो, हे ऐकूनच मला 'आकडी' येते.''

हे ऐकल्यावर डूल जोरजोरात किणकिणू लागले.

गजरेभाऊ कुरकुरत म्हणाले, ''या बायकांची एक गोष्ट मला समजत नाही.''

या बायका डोक्यावर कुठल्यातरी खतरनाक वासाचं तेल थापतात आणि त्यावर मंद सुगंधी फुलांचा गजरा टोचतात.

व्हेरी डिस्गस्टिंग!''

''आँ? यात न समजण्यासारखं काय आहे?''

''कमालच आहे तुमची!''

''अहो, डोक्यावर कितीही तेल थापलं आणि डोचक्यात भाराभर फुलं माळली तरी त्याचा काही स्वत:ला वास घेता येत नाही म्हटलं.

त्यात आमची प्रकृती सुगंधी आणि नाजूक.

त्या तेलाच्या खतरी वासाने आणि पिना टोचल्याने आमच्यातील निम्मी फुले तर जागीच बेशुध्द पडतात!

उरलेल्या फुलांची पाठ त्या बायकांच्या खराटाछाप केसांवर घासून घासून सोलून निघते!!

काहीजणींची चुळबूळ इतकी असते की आमच्यातली काही फुले पिना खात खात त्यांच्या केसभूमीवर आपला प्राण सोडतात.

पण.. .. ..

.. या फुलांचं बलिदान व्यर्थ जात नाही!!''

''गाल रे गाल! भयानकच तुमचे हाल!! म्हणजे..? म्हणजे काय होतं काय नंतर..?''

''तुम्हाला म्हणून सांगतो; पण बाकी कुणाला सांगू नका.

जेव्हा बायकांच्या केसात फुले अखेरचा श्वास घेतात तेव्हापासूनच त्या बायकांचे केस टपाटपा गळायला लागतात!'' हे बोलताना गजऱ्याला खूप गहिवरून आलं.

त्याची काही फुलं कोमेजली. तर काहींच्या पाकळ्या आखडल्या.

डूल त्याला समजावत म्हणाले, ''इतकं काही अस्वस्थ व्हायचं कारण नाही. तुला माहीतच आहे, दिवसभर आम्ही त्यांच्या कानात लोंबकळत असतो.

इतकंच काय, आम्ही बायकांच्या 'हां' ला हा आणि 'ना' ला ना ही करत असतो!!''

त्यांच्या बॉडीलँग्वेजशी आम्ही अगदी एकरूप झालेलो असतो!

तरीपण या बायका... आम्हाला मानसिक त्रास देतात!''

''म्हणजे..? काय करतात काय?''

'आमचं कुटुंब तसं मोठं आणि टिकाऊ आहे. एका मोठ्या चपट्या डब्यात किंवा कपाटाच्या कोपऱ्यात आम्ही सुखाने राहतो; पण यांच्यामुळे आमच्यात अनेक गैरसमज निर्माण होतात.''

''अजूनही मला नीटसं कळलं नाही. गैरसमज... म्हणजे?''

'अरे, कपडे बदलल्यावर त्या आमच्या घराजवळ येतात.

मग आमच्या कुटुंबातील एकेकाला हातात घेऊन त्या म्हणतात, ''हा या साडीवर जात नाही.

हा या ड्रेसवर जात नाही.

हा जरा लाउड आहे.

हा तर चंपूच आहे.

याची तर अगदी रयाच गेलीय.

हा तर अगदी फेकून द्यायच्या लायकीचा आहे.

आणि.. आम्हाला देतात टाकून खाली.

खरं म्हणजे आम्ही त्यांच्याकडे जायला तयार असतो, उत्सुक असतो; पण यांचीच मिजास!

आमच्याविषयी असं खोटंनाटं बोलल्याने आम्हाला मानसिक त्रास होतो.

एकमेकांबद्दल गैरसमज निर्माण होतात.

मग खाली पडल्यावर... माझ्या तारा कुणा लहानग्याच्या नाकात जातात किंवा मणी माझ्याच बहिणीच्या तोंडात! हा त्रास वेगळाच!

'मॅचिंगचा बाऊ नको रे भाऊ' असं म्हणतात ते काय उगाच?''

गजरा फूल उडवत म्हणाला, ''तुम्ही वाईट वाटून घेऊ नका.

'मॅचिंगचा घोळ झाला की कान ओघळतात!' अशी एक चिनी म्हण आहे.

आज ना उद्या त्यांना अक्कल येईल.''

डूल किणकिणत म्हणाले,
''कधी कधी वाटतं..
पुढच्या जन्मी माळ व्हावं
आणि
यांच्या गळ्यात पडावं.
सगळ्या कुटुंबानं एकत्र नांदावं!''

गजरा हसत म्हणाला,
''व्वा!
आम्ही तर ठरवलंय...
पुढच्या जन्मी मागून पुढे यायचं.
हार व्हायचं!
गळ्यात पडून हरखून जायचं!!''

आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके online खरेदी करा
www.mehtapublishinghouse.com

e-books आपल्या आवडत्या लेखकांची पुस्तके आता Computer, i-pad आणि Tab वर वाचा.
play.google.com/store/books ● m.dailyhunt.in/Ebooks/marathi
www.amazon.com उपलब्ध....

मेहता मराठी ग्रंथजगत (Digital Edition)
पाच वर्षांचे सभासद व्हा आणि आमच्या सर्व पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा. वर्गणी - ४०० रुपये.(स्वामी सोडून)

T-Book Club
TBC ची मेंबरशीप घ्या. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा.

मेहता पब्लिशिंग हाऊस • : 9422046575 • sales@mehtapublishinghouse.com

– अनिल शिंदे

घेऊन ये पाऊस!

ढगा रे ढगा उभा नको राहूस
चल निघ येथून घेऊन ये पाऊस

समुद्रावरून उडताना
प्याला नाहीस का पाणी?
गात का बसलास
नुसती पावसाची गाणी
चार कोरडे आसू नको आता ढाळूस
चल निघ येथून...

रंग होईल काळा
म्हणून का घाबरलास?
पोट होईल जड
म्हणून का बिचकलास?
उत्तर दे शुंभासारखा उभा नको राहूस
चल निघ येथून...

पांढऱ्या गोऱ्या रंगाची
मारू नकोस ऐट
तहान लागेल तेव्हा
येईल तुला फीट
उगा दोन क्षणांचा भाव नको खाऊस
चल निघ येथून...

वीजताईला आवडतो
काळा रंगच बरं का!
चमकवते त्याला ती
अंधारातही बरं का!
वर बघ आता मान खाली नको घालूस
चल निघ येथून...

कर तुझ्या मित्रांना
आता तरी गोळा
नाहीतर दुष्काळाचा
उघडेल तिसरा डोळा
उगा वेड्या वाऱ्याबरोबर नको सुसाट धावूस
चल निघ येथून...

बरसवशील पाऊस
आणलेला जेव्हा
आनंदून जाईल
अवघे विश्व तेव्हा
सोन्यासारखी संधी नको फुका दवडूस
चल निघ येथून...

– रेणू गावस्कर

रमा आणि गीता

गेले काही दिवस रमाचं चित्त थाऱ्यावर नसायचं. वसतिगृहाच्या पायरीवर एकटीच बसून ती कसलातरी विचार करत राहायची. मैत्रिणी बोलवायला आल्या तरी तिला उठून आत जायचं नसायचं. मग कधीतरी नाईलाज झाल्यासारखी उठून आत जायची. मैत्रिणींवर चिडचिड करणं, अचानक रडणं हे तर नेहमीचंच झालं होतं.

काही वर्षांपूर्वी जर कोणी रमाला बघितलं असतं तर हीच ती रमा असं खरं वाटलं नसतं. तशी रमा खूप हसरी, खूप आनंदी अशी मुलगी नव्हतीच; पण प्रसन्न चेहरा, हसरे डोळे, नीट बांधलेल्या दोन लांब वेण्या आणि व्यवस्थित राहाणं यामुळे बघणाऱ्याचं लक्ष सहज वेधून घ्यायची ती. सातवीत गेली आणि खूप अभ्यास करायला लागली ती. खूप शिकायचं व डॉक्टर व्हायचं हे रमानं ठरवूनच टाकलं होतं.

रमा पाचेक वर्षाची होती तेव्हाच मुलींच्या या संस्थेत तिचा प्रवेश झाला होता. रमाचे वडील अचानक गेले आणि रमाच्या आईला रमा आणि तिची दोन वर्षांनी मोठी बहीण गीता यांची काहीतरी व्यवस्था करणं भाग पडलं. रमा मुलींच्या आश्रमात आली आणि गीता मात्र

कुठल्यातरी श्रीमंत घरी मालकीण बाईंच्या हाताखाली मदत करायला म्हणून गेली. राहता राहिला रमाचा आणि गीताचा छोटा भाऊ राजा. आईनं त्याला बरोबर घेतलं आणि एका इस्पितळात कामाला लागली ती लागलीच.

पाच वर्षांची रमा! भरल्या घरातून संस्थेत आली. सुरुवातीचे काही दिवस तर तिला काही सुचेना. गीताच्या, राजाच्या आणि आईच्या आठवणीनं डोळ्यातलं पाणी थांबतच नसे. मग हळूहळू तिला सवय झाली. वसतिगृहात राहणाऱ्या मैत्रिणी आवडायला लागल्या. सगळ्याजणी तिच्याचसारख्या अतिशय गरीब घरातून आल्या होत्या. कुणाला आई होती तर वडील नव्हते. काही जणींची परिस्थिती त्याच्या अगदी उलट आणि काही जणींना तर कोणीच नाही म्हणून आलेल्या.

रमा तिथं रमली. खूप अभ्यास करायचा, खूप खेळायचं आणि भविष्याची स्वप्नं बघत झोपी जायचं. आईची, भावंडांची आठवण यायची अधूनमधून; पण मग वर्षामागून वर्षं गेली. आठवणी थोड्या अंधुक झाल्या. रमा संस्थेत रमली.

रमा पाचवीत गेली आणि अचानक एक दिवस रमाची आई सकाळीच संस्थेत आली. बघताक्षणी रमाला वाटलं, आई किती खराब दिसतेय. काळवंडलेली, अगदी बारीक झालेली आई बघताना रमाच्या घशात आवंढा दाटून आला. डोळ्यांतून पाणी यायला लागलं. रमाच्या आईनं तिला पाहिलं नाही. तिची पाठ होती रमाकडे; पण ऑफिसच्या बाईंनी मात्र रमाच्या आईशी बोलता बोलता बाहेर घुटमळणाऱ्या रमाला बरोबर पाहिलं. 'रमा' अशी हाक मारत त्यांनी तिला आत बोलावलं.

हाक कानावर येताच, रमा ऑफिसमध्ये धावत सुटली. सरळ आईच्या जवळ गेली. दोघी एकमेकींकडे काही वेळ बघतच राहिल्या. मग रमाची नजर आईच्या शेजारी गेली. आईच्या शेजारी एक मुलगी बसली होती. गोरी, घारी आणि केसांच्या दोन जाडजूड वेण्या घातलेली ती मुलगी कोण व ती आपल्या आईबरोबर कशी हेच रमाला क्षणभर

समजलं नाही. मग मात्र डोक्यात एकदम प्रकाश पडला. ही तर गीता! आपली मोठी बहीण.

रमा काही बोलणार, आईला काही विचारणार एवढ्यात संस्थेच्या मुख्य बाई रमाला उद्देशून म्हणाल्या, ''रमा, गीताला ओळखलंस की नाही?'' मग आईकडे वळून त्या म्हणाल्या, ''पुष्कळ वर्षांनी भेटताहेत बहिणी बहिणी.'' रमाच्या आईनं पदरानं डोळे पुसले. होकारार्थी मान हलवली तशी बाई हसत हसत रमाला म्हणाल्या, ''रमा, गीता आता इथंच तुमच्यासोबत राहणार आहे. शाळेत येणार आहे तुमच्याबरोबर.'' रमाला एवढं सांगून मग त्या म्हणाल्या, ''काय, मग सांभाळून घेणार ना बहिणीला?''

अशा तऱ्हेने गीता संस्थेत राहायला आली. हळूहळू रमाला तिच्याकडून मधल्या एवढ्या वर्षात काय काय घडलं ते समजत गेलं. गीता जिथं राहायची, काम करायची, तिथल्या बाई म्हणे तिला खूप त्रास द्यायच्या, आधी त्यांनी गीताला शाळेत पाठवण्याचं तिच्या आईपाशी कबूल केलं खरं; पण प्रत्यक्षात मात्र त्यांनी आपला शब्द पाळला नाही. गीताला शाळेत जायला मिळालंच नाही. दिवसागणिक गीताची कामं मात्र वाढली. त्यातच गीताच्या हातून एखादं काम राहिलंच तर मालकीणबाई एक-दोन रट्टे द्यायला देखील मागे-पुढे बघत नसत.

शेवटी गीता आईकडे पळून आली. तशी ती यापूर्वी देखील एकदोनदा आली होती; पण आईनं तिला परत पोचवून दिलं होतं. तिसऱ्या वेळेला मात्र गीतानं परत जाणं साफ नाकारलं. आईनं मग संस्थेत संपर्क साधला आणि रमाच्या जोडीला गीताही संस्थेत दाखल झाली.

सुरुवातीचे दिवस खूप छान होते. बहिणी-बहिणींची छान गट्टी झाली होती. सारख्या बरोबर असायच्या दोघी. त्यातच गीतानं बाहेरून कानातले झुमके, केसांना लावायच्या पिना, रिबिनी, रंगीबेरंगी टिकल्या असं काय काय आणलं होतं. दोघीजणींची नुसती धमाल चाललेली

असायची.

पण मग हळूहळू चित्र बदलायला लागलं. गीता बाहेरच्या जगात राहिलेली होती. जिथं राहायची तिथं फिल्मी गाणी ऐकायची, टीव्हीवर तऱ्हेतऱ्हेचे डान्स बघायची. त्या सगळ्याचे प्रयोग ती इथं करायला लागली. गीताचा गोड आवाज, मोहक हावभाव यांनी मुली तर प्रभावित झाल्याच, पण शाळेतल्या बाईंचीही गीता आवडती झाली. त्या वर्षीचं शाळेचं स्नेहसंमेलन गीतामुळे चांगलंच गाजलं. तिनं लहान मुलींचं नृत्य बसवलं. मोठ्या मुलींची गाणी बसवली आणि स्वत: एक नाच केला. पालकांनी टाळ्यांचा नुसता कडकडाट केला. एवढंच नव्हे तर एका पालकांनी गीतासाठी खास बक्षीस जाहीर केलं.

त्या दिवशी गीता, रमा आणि बाकी सगळ्या मुली संस्थेत परतल्या तेव्हा जिच्या तिच्या तोंडी गीताशिवाय दुसरा विषय नव्हता. रमा दुरून हे सगळं बघत होती. स्तंभित होऊन बघत होती. अभ्यासात हुशार, निबंधात नंबर पटकावणारी, सुंदर चित्रं काढणारी रमा एकदम कोपऱ्यात गेली होती. गीताशिवाय शाळेचं पान हलत नव्हतं. संस्थेला तिचा अभिमान वाटत होता.

अर्थातच गीतामधली ती हुनर स्नेहसंमेलनापुरतीच राहिली नाही. दिवसेंदिवस गीता सर्वांची लाडकी होत गेली. रमाला सुरुवातीला तर काय चाललंय तेच कळेना. तिला बहिणीचा राग येत नव्हता. तिचा दुस्वास वाटत नव्हता; पण रमा अस्वस्थ झाली होती. बेचैन झाली होती. तिला सतत एकटं वाटायचं, सगळेजण मुद्दामच आपल्याकडे दुर्लक्ष करताहेत असं वाटायचं. अभ्यास करता करता ती एकदम सुन्न होऊन जायची.

गीताला मात्र या कशाचाच पत्ता नसावा. ती रमाशी फार प्रेमानं वागायची. इतकी वर्षं दुरावलेली बहीण आपल्याला भेटली याचंच तिला कोण अप्रुप होतं! शिवाय गीता जिथं काम करत होती, तिथं तिनं काय आणि किती सहन केलं होतं कोण जाणे! गीता खरंच रमावर प्रेमाचा वर्षाव करत होती आणि रमा मात्र...

अशीच पहिली टर्म संपली. शाळेची सहामाही परीक्षा झाली आणि शाळेनं सहलीचा कार्यक्रम जाहीर केला. अप्पूघर बघायचं आणि शेजारच्या बागेत खेळायला जायचं असा बेत होता. शाळेतली सगळीच मुलं जायची होती.

सहलीचा दिवस उजाडला. संस्थेतल्या सगळ्या मुलींची शाळा एकच असल्यानं मुली अगदी पहाटेच तयार होऊन शाळेत गेल्या. नेहमीप्रमाणे मुलींच्यात गीता आघाडीवर होती आणि रमा पिछाडीवर.

बरोब्बर सात वाजता बसेस आल्या. किलबिलाट करत मुली बसमध्ये चढल्या. गीता रमाला शोधत होती; पण रमानं मात्र चपळाई करून दुसऱ्याच मैत्रिणीशेजारची जागा पटकावली.

अप्पूघर मस्त मजेत पार पडलं. मुलींनी नुसती धांदल केली खेळताना. अप्पूघरात खेळून झालं. एका निवांत जागी सर्वांनी जेवणाचा समाचार घेतला. मग सगळे शिक्षक व मुली जवळच्याच बागेत गेल्या.

उन्हं उतरली होती. मुली खेळत होत्या. बागेत झोपाळे, घसरगुंड्या, सीसॉ, चक्रं, यांची नुसती रेलचेल होती. मुलींचा आरडाओरडा सुरू झाला. झोपाळ्यांच्या कर्रकर्र आवाजासोबत चेंडू फेकण्याचेही आवाज येऊ लागले.

काही वेळ रमा तिथंच घोटाळली. मग हळूहळू ती बागेच्या पायऱ्या चढून वरवर जायला लागली. केवढी मोठी बाग होती ती. रमा थोडी पुढे गेली आणि मागून बाईंनी आवाज दिला. 'रमा, अग कुठं निघालीस?' मागे वळून न बघताच रमा म्हणाली, 'बाई, इथंच कट्ट्यावर बसते.'

'फार पुढे जाऊ नकोस हं!' बाईंचे शब्द रमाच्या कानावर पडले; पण पाय मात्र पुढे पुढेच जात राहिले. तेवढ्यात एक वळण आलं. मग आणखी एक पायरी. रमा सगळ्या गर्दीपासून दूर आली. मनात मात्र विचारांची एकच गर्दी! मन उदास विचारांनी भरून गेलं होतं. मनात उसळणाऱ्या प्रत्येक विचारासरशी जणू रमा एक एक पायरी चढत होती. समोर बागेचं सर्वांत उंच टोक दिसत होतं. तरी रमा चढतच होती.

अचानक तिच्या कमरेला घट्ट मिठी बसली. रमाची गती थांबली.

रमानं मागे वळून पाहिलं. गीतानं तिला घट्ट धरलं होतं. गीताची नेहमीची हसरी मुद्रा लोप पावली होती. गीता रडत होती. तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. मागे रमाच्या वर्गशिक्षिका उभ्या होत्या. त्यांच्याही डोळ्यांत पाणी तरारलं होतं.

रमाला गीतानं अडवलं त्या क्षणी रमाला आपण किती दमलो आहोत, याची जाणीव झाली. ती धप्पकन् एका पायरीवर बसली. पाठोपाठ गीता आणि रमाच्या बाई बसल्या.

त्यानंतर त्या तिघीजणी एकमेकींशी बोलत होत्या. बोलता बोलता रडत होत्या, रडता, रडता हसत होत्या. गीता रमाला पुन्हा पुन्हा काहीतरी समजावून सांगत होती. गीताचं बोलणं ऐकताना बाईंची मान होकारार्थी हलत होती. रमा मात्र काहीच बोलत नव्हती. नुसतीच ऐकत होती, जिवाचा कान करून ऐकत होती.

बोलणं संपलं. तिघीही एकमेकींचा हात धरून उठल्या व परत फिरल्या, त्यावेळी रमाच्या चेहऱ्यावर खिन्नतेचा लवलेश देखील नव्हता. गीताचा हात धरून एखाद्या हरिणीसारखी उड्या मारत ती निघाली होती. बिच्चाऱ्या बाई! त्या आपल्या धडपड करत त्या दोघींना गाठण्याच्या प्रयत्नात होत्या.

रमा आणि गीता यांच्यात काय बोलणं झालं असेल, याचा अंदाज मुलांनो तुम्ही बांधायचा आहे. गीतानं काय सांगितलं असेल रमाला? रमाला एवढा आनंद कशाचा झाला असेल? तिची खिन्नता एवढी एकदम कशी काय पळून गेली असेल? बाईंची या सगळ्यात काय भूमिका असेल? या सगळ्याची उत्तरं तुम्ही तुमच्याच मनाला द्याल का? तुमचा एखादा मित्र किंवा मैत्रीण खिन्न, उदास झाला/झाली तर तुम्ही काय करता, हे जाणून घ्यायला आवडेल मला.



– वामन देशपांडे

बाळ आणि आजोबा – १

बाळाच्या सायकलवर आजोबा बसले
बाळाने जोरात भोकांड पसरले...

आजोबांनी बाळाचे चॉकलेट पळवले
बाळाने आजोबांना ठोसे लगावले...

आजोबांनी बाळाचा खाऊ घेतला
बाळाने आजोबांचा चावा घेतला...

आजोबांनी बाळाशी कट्टी केली
बाळाने आजोबांना मिठी मारली...

आजोबांनी बाळाला कुशीत घेतले
तेव्हा बाळ गाढझोपी गेले...

विज्ञान नवलाई

रॉकेट, यान यांचं अंतराळातलं भ्रमण होतं कसं?
पृथ्वीच्या आतबाहेर नक्की काय आहे?
जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे?
पशू-पक्षी आले कुठून? कसे? आणि जगतात कसे?
प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का?
सुरुवातीला आपण माणसं कुठून आलो? कसे होतो?
त्यावेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते?
हो! हो! हो!
या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतील एकाच खजिन्यात!

अंतराळ । आपले पूर्वज । भूगोल । खगोल । पशू-पक्षी । प्राणिजगत

डॉ. बाळ फोंडके

६ विषयांचं वैविध्य असणारा आगळावेगळा संच!

संचाची किंमत ३९०रु.

वरील ६ पुस्तकांचा एकत्र संच घेणे आवश्यक आहे.

– मधुमती शिंदे

वर्चस्व

निसर्गातला चित्रकार बहराला आला. सकाळ उजाडली. वसंताच्या आगमनाबरोबर उष्मा वाढलेला; पण सकाळच्या वाहत्या गार वाऱ्याबरोबर उन्हाची झळ कमी वाटत होती. सारं रान फळाफुलांनी बहरलं होतं. त्यामुळे पक्ष्यांची चंगळ होती. कोकिळाताई एका आंब्याच्या डहाळीवर आपले पंख पसरवून तानावर ताना छेडत होती. तिचे सूर जंगलामध्ये पसरत होते. शेजारचं एका डहाळीवरचं माकडाचं कुटुंब त्या आवाजाने जागं झालं. सूर्याची किरणं आता धीम्या गतीने आकाशात चढत होती. कोवळ्या उन्हात चमकणारी झाडे पशू-पक्ष्यांना खुणवत होती. गुलमोहर, बॉटलब्रश, कडुनिंब, चाफा, आंबा अशा अनेक झाडांचा मोहर बहरून आल्यामुळे त्याचा गंध वनामध्ये पसरला होता. जमिनीवर झाडाखालच्या गारव्यात अगणित रानफुले वाऱ्याच्या झुळकेबरोबर डोलत होती.

माकड आपला सकाळचा व्यायाम करून, पाय लांब करून सूर्याचं विलोभनीय रूप न्याहाळत होता. आता पक्ष्यांच्या किल-बिलाटाने जंगलाला पूर्णपणे जाग आली होती.

माकड, ''कोकिळाताई, पहाटे तुझ्या मंजूळ गाण्याने तू वनराई,

पशू-पक्ष्यांना जागं करतेस. तुझा रंग जरी सावळा असला तरी तुझा आवाज मधुर आहे. देवाने पाठविलेल्या पक्ष्यांमधील तू एक उत्कृष्ट गायिका आहेस व जी प्रखर उन्हात पण सूरमयी गीत गाऊन पृथ्वीला मंत्रमुग्ध करते. आंब्याचा मोहर जसा फुलतो तसा तुझा आवाजही खुलतो. मंत्रमुग्ध होऊन तुझं गाणं या वृक्षावर बसून ऐकावं असं प्रत्येक जीवाला वाटतं. मला एक गोष्ट तुला विचाराविशी वाटते. राग मानून घेऊ नकोस. तू एवढी गुणी, दयाळू; पण तू स्वत:ची अंडी कावळ्याच्या घरट्यात कावळिणीला उबवायला का लावतेस? किती तू आळशी गं! आई हा शब्द जगात सर्वांत श्रेष्ठ. त्याला तू मुकतेस. जेव्हा तुझी पिले मोठी होतात व ती कुहूकुहू करू लागतात, हे ऐकून कावळ्यांना दु:ख व आश्चर्य पण वाटतं. तुला आयती सुदृढपिले मिळतात. किती ही तुझी बनवाबनवी!''

कोकिळा, ''खरं आहे मित्रा; पण ती अंडी उबवत मला दिवसेंदिवस बसायचा कंटाळा येतो. मला मुक्तपणे वनामध्ये उडायला आवडतं; पण काही म्हण. कावळीणबाई अंडी उबवण्यात तरबेज आहेत. त्यांना ते जमतं! मग आपण कशाला त्रास करून घ्यायचा!''

बॉटलब्रशच्या लालचुटूक कळ्यांचा गुच्छ जमिनीकडे झुकलेला व त्याच्या लगतच रानफुलांचा मळा सजला होता. फुलांच्या सुगंधाने आकर्षित होऊन नुकत्याच जन्मलेल्या रंगीबेरंगी फूलपाखरांचा थवा त्या फुलांवर विहरू लागला व त्यांच्या बरोबरीने इवलेसे पक्षीपण आपल्या लांब चोचीने फुलांतील मध पिण्यात मग्न होते. फुलपाखरू व पक्ष्यांचे हितगुज चालू असते, तेवढ्यात कोकिळा फुलपाखरांना म्हणते,

''तुमच्यात अनेक तऱ्हेतऱ्हेचे रंग परमेश्वराने भरले आहेत, तुम्ही किती नाजूक आहात, नजाकतीने फुलांतील रस अलगद शोषून घेता!''

एक फुलपाखरू, ''कोकिळाताई धन्यवाद! पण आम्ही नुसते सुंदरच आहोत. आमचं जीवन क्षणभंगुर आहे. आमचा कुणालाच उपयोग नाही. आम्हाला उडतानापण काळजी घ्यावी लागते. काटेरी

झाडावर बसलो तर आमचे नाजूक पंख फाटतात. म्हणून आम्हाला जपून अलगदपणे उडावं लागतं.''

कोकिळा, ''तुम्ही परमेश्वराची एक नाजूक, सुंदर निर्मिती आहात; पण तुम्हाला माहीत नाही. तुम्ही जेव्हा उडता तेव्हा फुलांतील परागकण दुसरीकडे टाकता व त्यातून नवनिर्मिती होते.''

आता सूर्यबिंब आकाशात चमकायला लागते व त्याच्या आगमनाने असंख्य फुले उमलतात व ती फुले पाहून फुलपाखरे त्यांच्यावर स्वच्छंदीपणे बागडू लागतात. अकस्मात मधमाश्यांचा घोळका त्या फुलांवर गुंजारव करू लागतो व आपलं वर्चस्व गाजवू लागतो. बिच्चारी फुलपाखरे भेदरून जातात व मधमाश्या त्यांच्यावर कडाडतात, 'ही आमची जागा आहे. आम्ही दररोज येतो व पराग घेऊन मध तयार करतो. तुम्ही फक्त स्वत:चं पोट भरण्याचा विचार करता; पण आम्ही खूप कष्टाने मधुर मध बनवतो. तुम्ही इथून ताबडतोब निघून जा. नाहीतर आम्ही आमच्या काटेरी पायांनी तुमचे पंख कापून टाकू व रक्तबंबाळ करू. मग तुम्हाला उडतापण येणार नाही.'' फुलपाखरे घाबरून एकमेकांना...

''चला सवंगड्यांनो, ह्यांचा गुण कष्ट करून गोड, मोहक मध बनवायचा; पण ह्यांचे शब्द किती कटू आहेत! त्यांचे शब्द विषमतेने भरले आहेत. ते जिव्हारी लागतात. चला–''

साऱ्या परिसरावर शेवटची नजर फिरव-ताना फुलपाखरांचे डोळे भरून येतात व ते गुपचूप, वाद न घालता, खाली मान घालून दूरवर उडून जाण्याचा बेत करतात.

कोकिळेला दया येते. ती लगबगीने खाली उतरते व पंख पसरवून, चोच उंचावून रागाने म्हणते, ''नका हो मधमाश्यांनो ह्या बिचाऱ्या निष्पाप जीवांना त्रास देऊ. तुम्ही सदैव भेडसावणारे प्राणीजीव आहात. सतत गुणगुण करत डंख मारण्याच्या तयारीतच असता. ही परमेश्वराची जागा आहे. आपली कुणाचीच नव्हे, एवढे ध्यानात ठेवा.''

फुलपाखरांना संबोधून कोकिळा म्हणते–

''दु:खी होऊ नका. चला मित्रांनो, तुम्हाला दुसरीकडे, जिथे फुलांचा ताफा आहे, तेथे नेऊन सोडते. तुम्हाला सुरक्षित जागेवर नेते.''

माकड लांब उड्या मारत मधमाश्यांच्या जवळ येऊन उभा राहतो व म्हणतो,

''तुम्ही जेवढा गोड मध बनवता, त्याच्या दुपटीने तुमचे शब्द कडू व जिव्हारी लागणारे आहेत. तुमच्यात अहंकार भरलेला आहे.''

मधमाश्या माकड व कोकिळेच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतात व आपल्याच मस्तीत असतात.

राणीमाशी, ''चला गं, त्यांचं तत्त्वज्ञान त्यांच्याजवळच राहू दे. आपण आपल्या कामाला लागू या. खालच्या दर्जाच्या प्राण्यांकडून अपेक्षा करण्यात अर्थ नाही. ते फक्त स्वत:साठी जगतात. आपण असंख्य समुदायाने, एकजुटीने कष्ट करून मोहोळ तयार करतो. या मधाचा मनुष्यजातीला औषध म्हणून उपयोग होतो. मनुष्य हे मध घेऊन जाणार माहीत आहे.''

मधमाश्यांचा थवा पराग गोळा करून परतीच्या वाटेला लागतो. माकडाची चिकित्सक बुद्धी जागी होते. त्याला एक युक्ती सुचते व तो त्यांची नजर चुकवून, धीम्या गतीने त्यांचा मागोवा घेत एका भल्या मोठ्या डेरेदार चिंचेच्या झाडावर येऊन थांबतो. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नाही. ते भलंमोठं पोळं व त्याला फेर धरून घोंघावणाऱ्या माश्या. त्याच्या तोंडाला पाणी सुटतं व तो स्वत:शीच म्हणतो, ''भारी काम आहे की हे, आज मला मोठी मेजवानी मिळणार. खूप दिवसांनी भरपूर गोड खायला मिळणार. काढायला गेलो तर ह्या माश्या नक्कीच माझ्यावर हल्ला करतील; पण तरीही हे चतुराईने काढलंच पाहिजे व मध घेतल्याबरोबर तलावात जाऊन डुंबायचं.''

आता माकडाने चपळाईने त्या फणीला हात घातला व हावऱ्यासारखा लगबगीने थोडा मध तोंडात कोंबला. माश्यांच्या हल्ल्याची पर्वा न करता राहिलेले पोळे हातात धरून धूम ठोकली व तलावात जाऊन लपून बसला. मधमाश्या चिडून कितीतरी वेळ

पाण्यावर घोंघावत होत्या. बघता बघता सूर्य क्षितिजावर टेकला. क्षितिजावर लाल, फिकट केशरी रंगांची उधळण होऊ लागली. सबंध आकाश विलोभनीय दिसू लागलं. आता थकूनभागून मधमाश्या माकडाचा पाठलाग सोडून आपल्या घराकडे वळल्या. माकड त्यांना जाताना बघून पाण्याबाहेर येतो व मागे रेंगाळलेल्या मधमाश्यांना म्हणतो –

''तुम्ही आहात पिटुकल्या; पण नाकावर राग किती! तुम्ही मध तयार करता; पण तुमचे काटेरी पाय फुलांना टोचतात. तरी ते न चुकता तुम्हाला मध देतात. त्यांना तुमच्याकडून कसलीही अपेक्षा नाही. त्या मोबदल्यात तुम्ही त्यांना काय देता? काहीच नाही ना? त्या मधासाठी माझ्यावर हल्लाबोल केला. आम्ही पशू-पक्ष्यांनी नाही खाल्लं तर तो मनुष्यप्राणी हुशार, जो आगीचे पलिते घेऊन तुम्हाला जाळून मधाचे पोळे हस्तगत करतो व जी दुर्बल फुलपाखरे आहेत त्यांना तुम्ही हाकलून दिलं. असे ते किती परागकण खाणार होते? ते या पृथ्वीतलावरचे एक दिवसाचे पाहुणे आहेत. त्यांचे विलोभनीय रंग पृथ्वीतलावर उठून दिसतात. तरी ते गर्व करत नाहीत. ते ना कुणाला टोचून बोलतात ना कुणाच्या जीवाला घायाळ करतात. ते मस्त मौलासारखे फुलांवर बागडत राहतात.''

मधमाश्या, ''जरा चुकलंच. अति राग झाला. त्या एक दिवसाच्या सवंगड्यांशी आम्ही हितगुज पण करू शकलो नाही. आता यापुढे कुणाही दुबळ्या जीवाला आमचा विषारी डंख मारणार नाही व फुलपाखरांना तर नाहीच नाही.''

धीम्या गतीने संध्याकाळ पृथ्वी आपल्या कवेत घेत होती. तेवढ्यात कोकिळाताई दमूनभागून येताना दिसते.

माकड, ''खूप वेळ लावलास यायला! त्या फुलपाखरांना फुले मिळाली का?''

कोकिळा, ''अरे मित्रा, जरा श्वास तरी घेऊ दे! दमानं सगळं सांगते.

आपल्या जंगलाच्या शेजारी एक छान तलाव आहे. त्याच्या काठाला तऱ्हेतऱ्हेची फुलं उमललेली होती. पाण्यात बदकांचा समूह व लुसलुशीत गवत खायला आलेला सशांचा समूह अशा दोन्ही प्राण्यांशी मी त्यांची ओळख करून दिली. बदके तर एकदम त्यांना पाहून खूषच झाली. त्यांना खेळताना पाहून मला एक सत्कर्म केल्याचं समाधान वाटलं. एक तर फुलपाखरू सारखं सशाच्या नाकावर बसायचं व उडायचं. त्या उडलेल्या फुलपाखराला पकडायला ससा त्याच्या पाठोपाठ पळायचा. बदके पण पाण्याच्या बाहेर येऊन आपल्या ओल्या पंखांतले पाणी शिंपडून सशाला व फुलपाखरांना भिजवायचा प्रयत्न करायची. या तिघांचा खेळ बघून मला पण त्यांच्याबरोबर आपलं सर्वस्व विसरून खेळावंस वाटलं. ससे, बदके, फुलपाखरे यांच्याबरोबर उडत खेळत होते. बघता बघता तिन्हीसांज कधी झाली कळलंच नाही व परत उद्या यायचा वायदा करून मी आले आहे. तिथे ना हेवा, ना दावा, ना उच्च, ना नीच, सर्व कसं आनंदमय वातावरण होतं. दुश्मनी करण्यापेक्षा मित्र बनवावे. जेणेकरून आपले आयुष्य सुखमय व आनंददायी होईल.

माकड, ''तू गेल्यावर मी पण त्यांना त्यांची लायकी दाखवली. त्यांची नजर चुकवीत त्यांच्या पाठोपाठ जाऊन त्यांचं मधाचं पोळं एका क्षणात फस्त केलं व त्यांना सांगितलं, 'तुम्ही फुलपाखरांवर वर्चस्व दाखवत होता; पण तुम्ही कष्टानं बनवलेलं मधाचं पोळं एका क्षणात फस्त केलं! कधीही दुर्बलांची पिळवणूक करू नये. तुमचं वर्चस्व त्या क्षणासाठी तुम्हाला श्रेष्ठ बनवतं; पण दुसरं कुणीतरी पुढच्या कालावधीत तुमच्यापेक्षा श्रेष्ठ होतं व तुमचा नायनाट करतं.''

तात्पर्य – *सुख देण्यात जो आनंद आहे, तो दुःख देण्याने कधीच मिळत नाही.*

– प्रज्ञा कुलकर्णी

करू पर्यावरणाचे रक्षण

मुलांनो, समुद्र, नद्या, तलाव, खाडी
भरपूर हिरवीगार झाडी
खाडीलगतची खारफुटी
असे आपुली रक्षणकर्ती

वने, जंगले हीच आपुली
खरी संपत्ती
रक्षण त्यांचे केले असता
कधी न येती संकटे, आपत्ती

किडे, किटक, प्राणी, पक्षी
पर्यावरणाचा समतोल सांभाळती
जपणूक त्यांची केली असता
बागबगीचे बहरून येती

शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, गार वारे
सूर्य, चंद्र आणि तारका तारे
जगण्यासाठी असे आवश्यक सारे
महती त्यांची जाणून घेऊ मुलांनो, या रे

खालील चित्रात एकूण किती चौकोन त्रिकोण व गोल आहेत मोजा

△ _____

○ _____

□ _____

उत्तर : चौकोन – १२ / गोल – १३ / त्रिकोण – ७

– अनिल शिंदे

आत्मघाती पृथ्वीकर

'आज आपल्या या ग्रहावर सार्वमत होणार आहे. आपले १०० आकाशवीर नुकतेच पृथ्वी नावाच्या ग्रहाची पाहणी मोहीम करून परतले आहेत. कॅप्टन ध्यास यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली आहे. आपण 'पृथ्वी'चा विचार भावी वसाहत करण्याच्या दृष्टीने करणार की नाही, हे आता आपल्याला आज ठरवायचं आहे. त्यापूर्वी कॅप्टन ध्यास आपणा सर्वांनाच पृथ्वीबाबत तपशिलात माहिती देतील, स्वत:ची व त्यांच्या चमूची निरीक्षणे सांगतील. त्यानंतर आपण सर्वांनी निर्णय घ्यायचा आहे,' असे ग्रहप्रमुखाने त्या खास जाहीर सभेत घोषित केले. हा अवघा ग्रह या सभेकडे लक्ष लावून बसला होता. असंख्य लोक या सभेला हजर होते; पण त्याहून कितीतरी पटीने अधिक लोक घरी टीव्ही संचावर सभा ऐकत-पाहत होते. ही सभा म्हणजे आपल्या जीवन-मरणाच्या प्रश्नाचे उत्तर देणारी ठरणार, असे प्रत्येकास वाटत होते. ग्रहप्रमुखाच्या प्रास्ताविकानंतर कॅप्टन ध्यास उभे राहिले नि सर्वत्र कमालीची शांतता पसरली.

'आम्ही १०० अवकाशवीर पृथ्वी नावाच्या ग्रहावर उतरून तेथील विविध गोष्टींची पाहणी करून नुकतेच आपल्या ग्रहावर

परतलो आहोत. आमच्या संपूर्ण चमूचं तुम्ही जे जंगी स्वागत केलंत त्यावरून तुम्ही आमची किती उत्सुकतेनं वाट पाहत होता, हे आम्हाला समजून आलं. आमची ही काळजी करण्याबद्दल सर्वांनाच मनापासून धन्यवाद,' असं उंच आवाजात, काहीशा वेगात बोलून कॅप्टन ध्यास थोडावेळ थांबला.

कॅप्टन थांबला नि तेव्हा उपस्थित सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. 'पण यांच्या या पृथ्वी मोहिमेचं झालं काय?' 'हो ना! हे त्यांनी प्रथम सांगायला हवं,' अशी कुजबूज समोरच्या गर्दीत होत होती.

हो, हो, हो! थोडं थांबा! तुमच्या सर्व शंकांचं मी समाधान करणार आहे. सर्व प्रश्नांची उत्तरं मी देणार आहे. आमच्या पृथ्वी मोहिमेची सर्व माहिती आम्ही आपल्याला दृक्श्राव्य स्वरूपात देणार आहोत...' कॅप्टनच्या या वक्तव्यानंतर समोर एकदम शांतता पसरली.

'तुम्हाला ठाऊकच आहे, आपल्या या सूर्यमालेतील आपला हा तिसरा ग्रह व आम्ही ज्या ग्रहावर जाऊन आलो तो ग्रह त्यांच्या सूर्यमालेतील तिसरा ग्रह आहे. यामुळेच दोन्ही ग्रहांवरचे वातावरण हे सजीवांसाठी अगदी पोषक असे आहे. तिथे प्राणवायू आहे, तिथे पाणी आहे, आपल्याला जगण्यासाठी आवश्यक जे जे म्हणून लागतं ते ते तिथं आहे.'

गर्दीनं पुन्हा टाळ्यांचा कडकडाट केला नि दाद दिली. सर्वांच्याच मनात आशा पल्लवित झाल्या. 'मला ठाऊक आहे, तुमच्या या टाळ्या नि तुम्ही यातून जो आनंद व्यक्त करता आहात ही फार महत्त्वाची बाब आहे; पण आधी आमच्या मोहिमेतील आमची निरीक्षणे, आमचे निष्कर्ष हे सारे ऐकून घ्या, पाहून घ्या नि मग आपण त्यातून आनंद व्यक्त करायचा की दु:ख ते ठरवू या!'

कॅप्टन ध्यासच्या या वक्तव्यानंतर तिथे एकदम शांतता पसरली. शंभर जणांच्या या अवकाश मोहिमेचं अंतिम फलित तरी काय, असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात उभा राहिला.

''तुम्हाला सर्वांना ठाऊक आहे, आपला हा ग्रह येत्या काही

शतकात महाभयंकर प्रलयामुळं नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. यामुळेच आपण शेकडो वर्षे आपल्या ग्रहासारखाच ग्रह या विश्वात कुठे आहे का, याचा शोध घेत आहोत. त्यातूनच पृथ्वीची माहिती आपल्याला मिळाली. आपण प्रारंभी जीवरहित अवकाशयाने पाठविली. त्यातून आपल्याला बरीच माहिती मिळाली. सर्वांत महत्त्वाची माहिती म्हणजे तिथं सजीव सृष्टी आहे. याचा अर्थ सजीवांना जगण्यासाठी, फुलण्यासाठी, वाढण्यासाठी उपयुक्त वातावरण तिथं आहे. यामुळेच आपण आपल्या काही अवकाशवीरांना पाठवून, प्रत्यक्ष तिथं उतरवून काही माहिती मिळवली. ती माहिती देखील उत्साहवर्धकच होती आणि आता आपण तिथं जाऊन वस्ती करू शकतो का, याचा अभ्यास करणे गरजेचे होते. म्हणूनच आपण अथक परिश्रम व मोठी साधनसामग्री वापरून ही १०० अवकाशवीरांची मोहीम आखली. त्या पृथ्वीवर कानाकोपऱ्यात जाऊन तेथील प्रदेशांची संपूर्ण माहिती घ्यावी, हा तिचा मुख्य उद्देश होता. शक्य झाल्यास तेथील सर्वांत प्रगत अशी जी सजीवांची जात आहे, त्या माणसाशी संपर्क साधावा असाही उद्देश होता. ही मोहीम खूपच खर्चिक होती, धोक्याची, जोखमीची होती. आपल्या ग्रहापासून पृथ्वीपर्यंतचं अंतर हेच मुळी पहिलं आव्हान होतं; पण आपल्या बुद्धिमान शास्त्रज्ञांनी प्रकाशाच्या वेगाजवळ पोहोचू शकेल अशा वेगाचं अवकाशयान तयार केल आणि यातच सुधारणा करत एकाच वेळी १०० अवकाशवीरांना पृथ्वीपर्यंत नेऊ शकेल असं अद्ययावत यान तयार केलं आणि अखेर संपूर्ण तयारी करून आम्ही पृथ्वी मोहीम आखली.' यानंतर कॅप्टन ध्यास क्षणभर थांबला, त्यानं सर्वांकडे एक नजर टाकली. सर्वचजण कानात प्राण आणून त्याचा एकेक शब्द ऐकत होते. केवळ समोर जमलेलेच नव्हे तर या ग्रहावरचा प्रत्येक जीव आपापल्या घरी बसून तेथील टीव्ही संचावर त्याचं भाषण ऐकत होते.

'मोठ्या खडतर व दीर्घ अशा कालावधीच्या प्रवासानंतर आम्ही

पृथ्वीवर पोहोचलो. आधीच्या मोहिमांमध्ये निश्चित केलेल्या जागेवरच आम्ही उतरलो. आपल्या खास प्रणालीमुळे पृथ्वीकरांना आम्ही तिथे उतरल्याचा बिलकुल पत्ता लागला नाही. यानंतर आम्ही आपल्या १०० अवकाशवीरांची प्रत्येकी दहा-दहा जणांची दहा पथके करून पृथ्वीच्या विविध भागांच्या पाहणीसाठी रवाना केली. प्रत्येक पथकाने आपल्याकडे सोपविलेल्या भागाची बारकाईने पाहणी केली. तेथील लोकांशी संपर्क साधला. त्यांच्या संगणकावरील माहिती पाहिली, अभ्यासली, गोळा केली नि येताना बरोबर आणली. ती सगळी माहिती आज मी तुम्हाला सांगणार आहे.'

'यापूर्वीच्या अवकाश मोहिमांतून आपल्याला समजलेच होते, की पृथ्वी ग्रहाभोवती वातावरण आहे. पृथ्वीचा ७० टक्के भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. त्यापैकी फारच थोडा भाग पाणी हे पिण्यासाठी उपयोगात आणता येते. अद्याप समुद्राचं पाणी मोठ्या प्रमाणावर पिण्यासाठी उपलब्ध करण्याचं तंत्र तेथील माणसाला अवगत झालेलं नाही. आपल्या प्रगतीच्या तुलनेत तो माणूस बराच मागासलेला आहे. आपण खूप प्रगती केलीय या भ्रमात तो आहे,' असं म्हणत कॅप्टननं चेष्टेचा स्वर असलेले हास्य केले. त्याचं आपण अधिक प्रगत आहोत हे वाक्य सर्वांना खूपच आवडलं. काहींनी टाळ्याही वाजवल्या. १०० अवकाशवीरांच्या चेहऱ्यावरही हास्य उमटलं होतं.

'अर्थात त्या माणसानं अजिबात प्रगती केली नाही असं नाही; पण त्या ग्रहावर सर्वत्र एकसारखी प्रगती झाली आहे असं मात्र नाही. उलट जसजशी तिथं प्रगती होत चालली आहे तसतशी तिथं विषमता वाढते आहे. भूभागाचा विचार करता त्या अंडाकृती पृथ्वीवर पाच खंड आहेत नि असंख्य देश आहेत. मी आत्ताच जो विषमतेचा उल्लेख केला ती विषमता भागाभगात आहे, तशी देशादेशांत आहे, गटांगटांत आहे. तिथं श्रीमंत देशांचा गट आहे. गरीब राष्ट्रांचा गट आहे. एकाच देशातही प्रचंड प्रमाणात विषमता आहे. ही विषमता

आर्थिक, लष्करी, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध प्रकारची आहे. आणखी आपल्या दृष्टीने गमतीची गोष्ट म्हणजे तिथं धर्म, जाती, वंश, लिंग, भाषा, वर्ग या प्रत्येक बाबीत कमालीचे मतभेद, संघर्ष आहेत. बडे देश स्वत:च्या आर्थिक व लष्करी ताकदीवर इतरांना नमवू पाहतात. मग काही बड्यांतच स्पर्धा सुरू होते. यातून गटबाजी होते.'

'या गटबाजीतून या पृथ्वीवर आतापर्यंत दोन महायुद्धे झाली आहेत. महायुद्धे म्हणजे जग दोन गटांत विभागून त्यात युद्ध होणं. त्यात लक्षावधी माणसे ठार झाली. दुसऱ्या महायुद्धात तर अमेरिका नावाच्या देशानं जपान नावाच्या देशातील शहरांवर अणुबॉम्ब नावाचं महासंहारक अस्त्र वापरलं. ज्यामुळे दोन शहरं उद्ध्वस्त झाली. तेथील माणसांसह मोठी जीवितहानी झाली. आज सुमारे ७० वर्षं झाली तरी अद्याप तिथे त्या बॉम्बचे परिणाम दिसतात. आपल्या एका पथकाने तिथे प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली... आणि आणखी महत्त्वाची बाब म्हणजे आता सुमारे दहा देश अण्वस्त्रांनी सज्ज आहेत. १९४५च्या महायुद्धात वापरलेल्या बॉम्बच्या कित्येक पटीने अधिक क्षमतेचे बॉम्ब तयार केले आहेत. आज तेथील अण्वस्त्रधारी देशांच्या संख्येत वाढझाली आहे. आज पृथ्वीवर सुमारे सोळा हजार अणुबॉम्ब आहेत. या सर्व बॉम्बची क्षमता लक्षात घेतली तर त्या पृथ्वीला अनेकदा नष्ट करण्याची 'कामगिरी' माणूस बजावू शकेल. एकीकडे आपसातील वैमनस्यामुळे एकेक देश आपली संहारक शक्ती वाढवत आहे. दुसरीकडे परग्रहावरून हल्ला झालाच तर याचाही 'तो' माणूस विचार करत आहे. यामुळेच आम्हाला अत्यंत सतर्कपणे तिथं वावरावं लागलं.

कॅप्टन ध्यासनं क्षणभर थबकून दीर्घ श्वास घेतला तेव्हा जमलेल्या सर्वांनीही दीर्घ श्वास घेऊन नि:श्वास सोडला. अर्थात आपण पृथ्वीकरांच्या संहारक शक्तीला बिलकुलही भीक घालत नाही. घाबरत नाही. आपल्याकडे त्यांच्यापेक्षा अधिक प्रभावी व वेगळी शक्ती

आहे... विशेष म्हणजे पृथ्वीवर एकीकडे प्रचंड विषमता आहे. यामुळे गटागटांत, धर्माधर्मांत, जातीजातींत , देशादेशांत प्रचंड वैमनस्य आहे. अमेरिका, रशिया या बड्या राष्ट्रांत प्रचंड शस्त्र स्पर्धा चालू आहे. मध्यंतरी काही काळ तर ही स्पर्धा एवढी होती की तिला शीतयुद्ध म्हटलं जाई. त्यानंतर ही गटबाजी काही कारणांनी कमी झाली होती; पण आता पुन्हा ती वाढली आहे. पृथ्वीवरून बाहेरून तटस्थपणे नजर टाकली तर जिथं केव्हाही भडका उडू शकतो असे अनेक केंद्रबिंदू दिसतात. इस्त्रायल नावाचा देश, त्याच्याभोवती आठ अरब राष्ट्रे आहेत, त्यात संघर्ष चालूच असतो. आशियात भारत-चीन-पाकिस्तान हा तणावाचा पट्टा आहे. जमिनीच्या हव्यासावरून हा तणाव नको तितका व नको तितक्या प्रमाणात ताणला गेला आहे. द. कोरिया व उ. कोरियात तणाव आहे. जपान-चीन मध्ये ताण आहे. आयएस नावाची दहशतवादी संघटना पृथ्वीला धोका निर्माण करत आहे. 'दहशतवाद' ही या पृथ्वीला लाभलेली गेल्या ७० वर्षांतली मोठी 'देणगी' आहे. खरंतर हा मोठा अभिशाप आहे. आपल्या कथित खऱ्या-खोट्या समस्यांकडे जगाचं लक्ष वेधण्यासाठी मोठे मोठे संहार तिथं केले जातात. या मूर्खपणाची तर आम्हाला कीव कराविशी वाटली.

अर्थात पृथ्वीकरांच्या या संहारक शक्तीला आपण घाबरण्याचे कारण नाही याचं कारण त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीनं अधिक आपलं सामर्थ्य आहे; पण मग तरीही तिथल्या इतर बाबींचाही विचार आम्ही केला. या माणूस नावाच्या कथित प्रगत प्राण्यानं तिथं एवढा हैदोस घातला आहे, की त्यानं स्वत:चा अवघा ग्रह गोल राहण्यासाठी धोकादायक करून टाकला आहे. प्रगतीच्या नावाखाली कारखानदारी, वाहनांची बेसुमार संख्या यामुळे हवा, पाणी, वातावरण यापैकी प्रत्येक बाबीचं अतिरेकी प्रदूषण केलं आहे. यामुळं तिथं श्वास घेणं म्हणजे नव्या प्राणघातक गोष्टींना आमंत्रण देण्यासारखं आहे. कान फुटून जावेत अशी ध्वनिप्रदूषण पातळी झाली आहे.

सगळ्या प्रकारचं प्रदूषण वाढलं आहे. प्रत्येक माणूस, प्रत्येक प्रदेश, प्रत्येक देश, प्रत्येक समूह आपल्याच पोळीवर आजच सगळं तूप ओढून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यांची ओरबडण्याची वृत्ती वाढली आहे. यामुळे सर्वत्र कायम अशांती, असमाधान दिसतं आहे. तिथं कोणालाही कुणावर विश्वास उरलेला नाही. यामुळे सतत संघर्षाची स्थिती आहे. कुठं कशाची ठिणगी पडेल काही सांगता येत नाही आणि कोणता मर्कटमाणूस कधी त्या महासंहारक अस्त्रांचा अहंकारातून वा सुडापोटी वापर करील काही सांगता येत नाही,' कॅप्टन ध्यास पुन्हा थांबला.

तो थांबताच त्याचं म्हणणं ऐकणाऱ्या असंख्य जणांत चुळबूळ सुरू झाली. चर्चा सुरू झाली; पण मग आता काय? आपण पृथ्वी काबीज करायची की नाही? पृथ्वीकरांशी संवाद साधून काही विचार करायचा की नाही? नेमकं करायचं काय?' अशी कुजबूज चालू असतानाच कॅप्टन ध्यास म्हणाला, 'मी तुम्हाला हे सारं चित्र सारांश रूपात दाखवलं आहे. या प्रत्येक माहितीचा पुरावा मी सर्वांना पाहण्यासाठी आपल्या साईटवर खुला केला आहे. सर्वांनी तो तपशील पाहावा. यानंतर आपण आपल्या अवघ्या ग्रहाकडून सार्वमत घेऊ या. त्यातून जे ठरेल. ते करूया. तरीही या मोहिमेबद्दलच्या माझ्या भाषणाच्या समारोपात काही गोष्टी स्पष्ट करू इच्छितो...

'... आपल्याप्रमाणेच त्या पृथ्वी ग्रहाला अब्जावधी वर्षांचा इतिहास आहे. तिथं अनेक प्रलय झाले आहेत नि तिचे स्वरूप वारंवार पूर्णत: बदलत आले आहे. तेथील माणूस हा सर्वांत प्रगत, बुद्धिवादी प्राणी; पण सध्या तोच अविचारीपणे वागत आहे. आपण आपल्या पृथ्वीचा भावी पिढ्यांसाठी सांभाळ केला पाहिजे, याचा विचार न करता उद्याचा उपभोगही आज घ्यावा अशी चंगळवादी वृत्ती तिथं वाढली आहे. यामुळेच काही मूठभर लोक अवघ्या पृथ्वीवरच्या अब्जावधींना वेठीस धरत आहेत. यामुळेच एकीकडे पृथ्वीवर

महासंहारक अस्त्रांची कोठारं माणसानं भरली आहेत तर दुसरीकडे अहंकार, विषमता, अन्याय, आक्रमकता यामुळे तिथं केव्हाही प्रक्षोभ, आगडोंब उसळेल, अशी स्थिती आहे. आपण आपल्या ग्रहासारखा पर्यायी ग्रह शोधत होतो. पृथ्वीच्या रूपानं तो गवसलाही; पण आता या दीर्घ मोहिमेत पुढे आलेल्या वस्तुस्थितीमुळे आपण या पर्यायाचा सकारात्मक विचार करायचा की कसं, ते ठरविण्याची वेळ आली आहे. निर्णय आपण सर्वांनी एकत्रितपणे घ्यायचा आहे.'

कॅप्टन ध्यासचं व्याख्यान संपलं. टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यानंतर या ग्रहावरच्या सर्व रहिवासी नागरिकांनी आपापले व्होटिंग पॅड हाती घेतले. या पृथ्वी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यापुढे तीन पर्याय ठेवण्यात आले होते. थोडक्यात, या पॅडद्वारे त्यांना महत्त्वाच्या विषयावर आपापलं मत नोंदवायचं होतं!

१. अंहकारी, मस्तवाल व आत्मघातकी पृथ्वीकरांना पराभूत करून तो ग्रह ताब्यात घ्यावा.

२. पृथ्वीकरांनाच मदतीला घेऊन या विश्वात एखादा नवा पर्याय शोधावा.

३. लवकरच आत्मघाताने स्वर्गासारखा पृथ्वी ग्रह नष्ट करण्यास निघालेल्या पृथ्वीकरांचा व त्यांच्या ग्रहाचा विचार करणे देखील सोडून द्यावे.

या सर्व ग्रहवासियांनी व्होटिंग पॅडवरचं बटन दाबलं. काही क्षणांत या मतदानाचा निर्णय सर्वत्र झळकला. वरीलपैकी तिसऱ्या पर्यायाला १००टक्के मतं पडली होती. याचा अर्थ या ग्रहावरील नागरिकांनी 'पृथ्वी' हा शब्द आपापल्या शब्दकोशातून कायमचा हद्दपार केला होता!

– वामन देशपांडे

बाळ आणि आजोबा – २

बाळ एकटेच खेळत बसले
स्वत:शी जोरजोरात हसू लागले...

बाळाने घरभर खेळणी पसरली
आई जोरात धावत आली...

आईने बाळाचे बकोटे धरले
बाळाला अंगणात नेऊन ठेवले...

बाळ जोराने रडू लागले
काठी टेकत आजोबा आले...

''बाळा रे बाळा, काय झाले तुला''
आजोबांना पाहून बाळ हसू लागला

आजोबांनी बाळाला खांद्यावर बसवले
दोघेही अंगणात नाचू लागले...

ससोबा-हसोबा मालिका

राजीव तांबे

चला चहा पिऊ या!
आणि इतर कथा

ससोबा-हसोबाची
मस्त मस्ती
वाचता वाचता
सगळेच हसती
हा ऽ हा ऽ हा ऽ

शेपटीवालं झाड
आणि इतर कथा



ससुल्या आणि इतर कथा

प्रत्येकी किंमत
६० रु.
पोस्टेज खर्च
५० रु.

शूर ससोबा

छत्रीची जादू
आणि इतर कथा

झॅकपॅक शोध
आणि इतर कथा

– ना. द. जोशी

चतुर पिठू

पिठूच्या चतुरपणामुळे आम्ही वाचलो. महम्मदभाईचे घोडे चांगले होते. त्यानी कुठेही दगा दिला नाही. महम्मदभाई स्वाभिमानाने म्हणाला, ''ये गवमेंटके ट्रेंड घोडे है । ये कभी रास्तेमें पेशाब भी नहीं करेंगे । किनारे पे खडे होकर पेशाब करेंगे । ये वायलंट कभी नहीं होते । रस्तेमें गिरते भी नहीं । ये गवमेंट घोडे है । ट्रेंड।''

आम्ही पहलगाममार्गे श्री अमरनाथ दर्शनाला गेलो होतो.

१९९८ साल. पहलगाम श्रीनगरपासून ९० किमी अंतरावर आहे. अमरनाथ यात्रेला जाताना पहिला मुक्काम इथं करावा लागतो म्हणून पहलगाम. या सुंदर गावाचे नैसर्गिक सौंदर्य जगप्रसिद्ध आहे.

इथं आम्हाला एक चांगला गाईड मिळाला. त्यानं या परिसराची छान माहिती सांगितली.

पहलगामपासून चंदनवाडी १६ किमी अंतरावर आहे. अमरनाथ यात्रेतील हे पहिले चरण आहे. हा रस्ता लिंदर नदीच्या किनाऱ्यावरून जातो. निसर्गसौंदर्याने नटलेले चंदनवाडी गाव समुद्रसपाटी पासून ९५०० फूट उंचीवर आहे. बर्फाचाच तयार झालेला आकर्षक पूल इथं आहे. या पुलावरूनच पुढे शेषनागची वाट आहे. हिमाच्छादित पर्वत शिखरे आणि स्वच्छ ओहोळ दिसतात.

इथं पुढील अमरनाथ यात्रेसाठी घोडे मिळतात. घोड्यासाठी पैसे भरल्यावर लाल कार्ड मिळते. गाईड म्हणाला, ''हे कार्ड जपून ठेवा. अतिरेकी ही कार्डे चोरतात. त्यांचा गैरवापर होतो.''

गाईडच्या सूचनेप्रमाणे सामान नेण्यासाठी आम्ही पिठ्ठू हमाल इथेच घेतला.

गाईड म्हणाला, ''पहलगाम-चंदनवाडी-शेषनाग-पंचतरणी-अमरनाथ हा जसा मार्ग आहे तसाच पहलगाम- अस्मानमर्ग - हत्यारा तलाव चढण, पंचतरणी-अमरनाथ असाही मार्ग होता. आता हा मार्ग बंद आहे.''

हत्यारा तालाब उंच आणि सरळ चढण आहे. येथील दृश्य अत्यंत नयनरम्य आहे. इथं स्फटिकासारख्या स्वच्छ निळ्या पाण्यात विशाल हिमखंड तरंगताना दिसतात. एका यात्रेकरूने विचारले, ''हत्यारा तलाव हे नाव या तलावाला का पडले?''

गाईड म्हणाला, ''पूर्वी काही वैष्णव साधू अमरनाथ दर्शन घेऊन या मार्गाने येत असताना त्यांनी इथं जोरजोरात शंखनाद केला. या ध्वनीमुळे वायूमंडळात प्रकंपने निर्माण झाली. त्यामुळे प्रचंड वारा वाहू लागला. घोडे, खेचरे, माणसे या वाऱ्यामुळे तलावात पडली. शेकडो माणसे मरण पावली. तेव्हापासून हा मार्ग बंद करण्यात आला.

चंदनवाडी- शेषनाग हे अंतर १३कि.मी. आहे. हा मार्ग अतिशय दुर्गम आहे. चंदनवाडीपासून दोन कि.मी. अंतरावर पिस्सू घोटी आहे. हा मार्ग झेड (Z) आकाराचा आहे.

यात्रेकरूला पाठीवर घेऊन वाट चढणे घोड्यांनासुद्धा अवघड होते.

शेषनाग हा पर्वत आहे. समुद्र सपाटीपासून १२,२३० फूट उंचीवर आहे. इथले निळेभोर सरोवर नयनरम्य आहे.

आम्ही इथं भाड्याने तंबू (Tent) घेतला; इथं लंगर आहेत; पण भूक लागत नाही. सर्दी-खोकला– ताप हे आजार होत नाहीत; पण काही लोकांना श्वास घ्यायला त्रास होतो. इथं लष्कराचे मेडिकल हेल्थ सेंटर आहे.

शेषनागपर्यंत घोडे-घोडेवाले आणि पिठ्ठू आमच्या बरोबर होते; पण गाईड मात्र चंदनवाडीला परत गेला.

शेषनाग-पंचतरणी १३ किमी अंतर आहे. वाटेत महागुणस पर्वत

आहे. तो १४ हजार फुटापेक्षा (४७१८ मी.) जास्त उंच आहे.

आम्ही घोड्यावरून जात होतो. आमच्या पिशव्या घोड्याच्या पाठीवर होत्या. त्यात घोड्याचे लाल कार्ड होते. शेषनागला रात्री घोडेवाल्यांनी घोडे चरायला सोडले होते; पण रात्री घोडे पळून गेले.

सकाळी घाडेवाले आले. म्हणाले, ''तुम्ही इथंच थांबा. आम्ही घोडे शोधून आणतो.''

घोडेवाले निघून गेले. पिठ्ठू सामान घेऊन अगदी पहाटेच बाहेर पडला. तो हिमनदी ओलांडून बराच वर आला आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली.

महागुणस पर्वतावर बर्फ पडू लागल्याने वाहतूक बंद करण्यात आली. त्यामुळे घोडेवाले पुढे जाऊ शकले नाहीत. पिठ्ठू मात्र या बंदीत अडकला नाही. तो अगोदरच फार पुढे गेला होता.

पाऊस थांबल्यानंतर आम्ही महागुणसकडे निघालो. ही अवघड चढण आहे. यात्रेतला हा सर्वांत उंच पर्वत आहे.

महागुणस पर्वतावर प्रचंड गर्दी. खालून आणि वरून पालख्या, घोडे, दंड्या, कंड्या, पादचारी यांची जा-ये चालू होती.

पिठ्ठू आमची वाट बघत उभा होता. त्या गर्दीत कान तुटलेला एक घोडा होता. तो दरीच्या काठावर 'शू' करीत होता.

'हा महम्मद भाईचा घोडा,' पिठ्ठू स्वत:शी म्हणाला आणि त्या प्रचंड गर्दीत घोड्यासमोर उभा राहिला.

''महम्मद भाय. कहाँ हो तुम?' पिठ्ठू ओरडला; पण महम्मदभाई तिथं होताच कुठे?

घोड्यावर बसलेले दोघे घाईने उतरले आणि आपल्या सुटकेस घेऊन गर्दीत पळून गेले.

पिठ्ठूला संशय आला. ''चोर... पकडो'' तो ओरडला. दोन लष्करी जवान त्याच्या जवळ आले. पिठ्ठूने त्यांचे वर्णन केले.

आम्ही महागुणस पर्वतावर आलो. तिथे पिठ्ठू आणि घोडेवाले यांची भेट झाली. घोडे मिळाल्याने 'घोडे'वाले आनंदात होते. पिठ्ठूकडून त्यांना सर्व हकिगत समजली.

त्या चोर घोडेस्वारांना लष्कराच्या जवानांनी दोन सुटकेससह

– प्रज्ञा कुलकर्णी

झाड लावा एकतरी

मुलांनो, आपल्या घराजवळ
एक तरी झाड लावा
रोज त्याला न चुकता
थोडे थोडे पाणी घाला

प्रेमाने त्याला आंजारा, गोंजारा
काळजी त्याची घेऊन
योग्य ती निगा राखा

पाहता पाहता
झाड वाढेल
पानापानांनी
फुलेल बहरेल
त्याचा डेरेदार वृक्ष होईल

अन्

कृतज्ञतेने ते तुम्हाला
प्राणवायु, सावली
फळे, फुले
भरभरून देईल
भरभरून देईल

छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी

राजीव तांबे

निरागसपणे मोठ्या माणसांचा कान धरणारी
तरीही त्यांना हवीहवीशी वाटणारी, बब्बड!



चंपी मालीश
आणि था..था..था!

गुळाची ढेप
आणि सरबत

प्रत्येकी किंमत
६० रु.
पोस्टेज खर्च
५० रु.



दांडोबा राक्षस
आणि गुळगुळीत मावशी

सू सुटका
आणि रंगीत डोंगर

पंचतरणीला पकडले.

ते दोघे चोर दहशतवादी होते. चंदनवाडीपासून ते आमच्या मागे मागे होते. शेषनागला संधी मिळाल्यावर हे घोडे पकडून ते पळून गेले. आमची लाल कार्डे पिशवीत आहेत हे त्यांना कळले असावे. त्यामुळे त्यांना कोणी अडवले नाही.

त्या सुटकेसमध्ये स्फोटके होती. अमरनाथ गुहेत त्यांना स्फोट घडवून आणायचा होता. इतर सामन्य यात्रेकरूसारखेच ते दिसत होते.

पिठ्ठूच्या जागरूकतेने फार मोठा अनर्थ टळला. गुन्हेगार, अतिरेकी इतर सर्व सामान्य माणसासारखेच दिसतात. सामान्य माणूस त्यांना ओळखू शकत नाही.

पंचतरणी-अमरनाथ गुहा हे अंतर सहा किमी आहे. पंचतरणी भैरव पर्वताच्या पायथ्याशी आहे. इथे पाच पहाडी नद्या आहेत. पंचतरणी हे अत्यंत सुंदर स्थान आहे. भगवान शंकराच्या जटांतून भगवती गंगा या ठिकाणी पाच धारांतून वाहते, म्हणून या स्थानाला पंचतरणी म्हणतात.

अमरनाथ गुहेजवळ अमरावती व पंचतरणीजल यांचा संगम आहे. अमरनाथ गुहेत विश्वप्रसिद्ध हिम शिवलिंग आहे. गुहेत ठिकठिकाणी पाण्याचे थेंब गळत असतात. हे शिवलिंग चंद्राच्या कलेप्रमाणे वाढते व कमी होते. बर्फानी बाबा अमरनाथच्या दर्शनासाठी ऋषी, मुनी, राजे, श्रीमंत, उद्योगपती सर्व येतात. अमरनाथ गुहा भव्य आहे. इथं कबुतरे दिसतात.

बर्फानी बाबा अमरनाथचे व्यवस्थित दर्शन झाले. धन्य झालो.

हे सर्व पिठ्ठूच्या चतुरपणामुळे घडले. महम्मद भाईचे घोडे चांगले होते. त्यानी कुठेही दगा दिला नाही. आपल्या घोड्याबद्दल बोलताना महम्मदभाई म्हणाला, ''ये गव्हमेंट के ट्रेंड घोडे है । ये कभी रास्ते मे पेशाब भी नही करेंगे । किनारे पे खडे होकर पेशाब करेंगे । मेरे घोडे कभी वायलंट नहीं होते । रास्ते में गिरते भी नही ।''

आम्ही पिठ्ठू, महम्मदभाई आणि त्याच्या घोड्यांचा योग्य बक्षीस देऊन सन्मान केला.

– राजीव तांबे

खरे-खोटे

'या मऊमऊ मखमली लाल गादीवर झोपायचा जाम कंटाळा आलाय आम्हाला.

या घरातल्या बायका झोप आली की झोपतात..

आणि जाग आली की.. लगेच बाहेर भटकायला जातात; पण आम्हाला मात्र महिनोन्‌महिने एकाच गादीवर अडकवून ठेवतात.

आता हा आमच्यावर अन्याय नाही का?

आम्हालाही वाटतं...

सकाळी लवकर उठावं.

गादीला लाथ मारून बाहेर पडावं...

मग घरातल्याच एखाद्या बाईच्या गळ्यात पडावं.

तिच्या कानाला लोंबकळावं किंवा तिच्या हातात गरगरावं.

तिच्यासोबत दुनिया पाहायला बाहेर पडावं.

पण छे! ...हा 'भटकंती योग' आम्हाला फारच कमी वेळा येतो.''

हे बोलणं ऐकून बाजूच्याच जांभळ्या गादीवर अस्ताव्यस्त पडलेल्यांची झोप चाळवली.

आळस देत ते म्हणाले, ''तुम्हाला 'भटकंती योग' खूप कमी येतो, याचं खरं कारण मी सांगायचं म्हणजे, टपराट माणसाने विमानाची

चौकशी करण्यासारखंच आहे.''

हे ऐकल्यावर पहिल्याने दुसऱ्याकडे प्रथम लक्षच दिलं नाही.

नंतर दुसऱ्याकडे तिरक्या डोळ्याने पाहत पहिले म्हणाले, ''आम्ही शंभर नंबरी आहोत हे तुम्हाला माहीत आहे का?

आम्ही तुमच्यासारखे खोटारडे नाही की फसवे पण नाही!

आम्ही अस्सल आहोत अस्सल!!

त्यामुळे आम्हाला काय ते खरं कारण सांगा. नो चिटिंग.''

''अहो, आम्ही नकली आहोत म्हणून तर आम्ही भटकतो... दुनिया बघतो! बारा घरची धूळ खातो. त्याचा थोडा त्रास होतो; पण ओके! पण तुम्हाला इतकी दगदग झेपणार नाही.

आम्ही आहोत रफ अँड टफ...समझे?

तुमच्यासारखे नाही अस्सल-फस्सल.

आमच्यात म्हणतात ना, 'तुम्ही एक दिवस कानात आणि छप्पन दिवस खोक्यात!' आमचं तसं नाही. आमच्या- शिवाय या बायकांचा कान हलत नाही!''

''तुम्ही जरा जास्तीच बोलताय असं वाटतंय मला.

अहो, 'तुम्ही चमकाल चमकाल, पण दोन दिवसांत विझाल' हे तरी तुम्हाला माहीत आहे ना? खूप दिवसांनी आपण भेटलो आहोत... तर न भांडता जरा चांगलं बोलता येईल का?''

हे ऐकताच जांभळ्या गादीवरचे खोटे दागिने खरेखुरे वरमले! खऱ्या दागिन्यांकडे पाहात म्हणाले,''सॉरी. आमचं काय चुकलं! सांगू का... तुमच्याकडे पाहता पाहता आम्ही नकळत स्वत:ला 'खरे' समजायला लागलो ना...''

आता मात्र 'खरे-खोटे' दोघेही हसायला लागले.

खोटे म्हणाले, ''अहो, परवा गंमतच झाली.''

नीताबरोबर आम्ही पार्टीला गेलो होतो. आदल्याच दिवशी तिने आम्हाला पॉलीश करून घेतलं होतं. इतकं चकाचक पॉलीश... की तुम्हीसुद्धा फसला असता!

पार्टीत नीताची चमकोगिरी सुरू होती.

सगळ्यांना वाटत होतं, हा खराच सेट आहे. नीताने आमची किंमत काय अव्वाच्यासव्वा सांगितली...म्हणजे तुमच्यापेक्षा पण खूप जास्ती सांगितली!

आणि इतरांनाही खरी वाटली...''

''कमाल आहे! या एव्हढ्या मोठ्या माणसांना अस्सल कोण आणि नकली कोण हे ओळखता येत नाही?'' खरे तणतणत म्हणाले.

'हॅऽऽ! पुढची गंमत तर ऐका..

नीताची मैत्रीण गीतासुद्धा सेम हार घालून आली.

आणि गीताचा हार होता.. विदाउट पॉलीश!

गीता आमच्याकडे पाहात जोरात ओरडली,''एऽऽ नीतेऽऽऽ पॉलीश केल्यावर हा सेट अगदी खराखुरा वाटतो ना ग?''

हे ऐकल्यावर नीताच्या चेहऱ्याचं पॉलीशच उडालं!!

मग घरी आल्यावर तिने आम्हा सगळ्यांना आपटलं या जांभळ्या गादीवर. त्या गीताचा राग तिने आमच्यावर काढला.''

'खरे' काही बोलणारच होते इतक्यात...

त्यांना पावलांचा आवाज ऐकू आला.

नीताची आई आली.

तिने कपाट उघडलं.

जांभळ्या बॉक्समधे अस्ताव्यस्त पडलेला चकचकीत सेट पाहून ती हळहळली.

सेट नीट ठेवत ती म्हणाली, ''... . .. .. ''

आईचं बोलणं ऐकल्यावर 'खोटे' खूश झाले,

तर...

'खरे' हुकातल्या हुकात हसले.

ओळखा पाहू...

नीताची आई काय म्हणाली असेल?

सोबतच्या शब्दकोड्यात काही वाहनांची नावे लपलेली आहेत ती ओळखा.

ट्र	ल	जी	प	लि	न	य	ज
क	रे	ल्वे	गा	डी	वि	ज	हा
क	घो	ज	हे	मा	ज	मा	ज
रि	न	डा	क	लि	गा	रि	न
ल	क्षा	टा	गा	र	कॉ	टा	गा
लि	बै	ल	गा	डी	य	प्ट	ट्र
मो	टा	र	सा	य	क	ल	र





– वामन देशपांडे

आजोबांची फजिती

पिटुकली खारुताई खिडकीशी आली
टकटका टकाटका पाहू लागली...

बाळ खिडकीपाशी बसून राहिले
जोराजोराने टाळ्या वाजवू लागले...

बाहेरून आजोबा धावत आले
खारुताईला पाहून घाबरून गेले...

आजोबांनी हातात काठी घेतली
खारुताईच्या शेपटीत जोरात घुसवली...

खारुताईने घाबरून उडी मारली
आजोबांच्या धोतरात चटकन् घुसली...

आजोबा थयाथया नाचू लागले
बाळाचा हात धरून पळत सुटले...

डेव्हीड मॅकी यांचे डॉ. वृषाली पटवर्धन यांनी अनुवादित केलेले बालसाहित्य

बालमित्रांनो, तुमच्या आवडत्या पॅचवर्कवाल्या रंगीबेरंगी एल्मर हत्तीच्या धाडसाची ही धमाल गोष्ट तुम्हाला नक्कीच आवडेल!



एल्मर

एकत्रित संच किंमत २५० रु.
पोस्टेज खर्च ५० रु.

एल्मर आणि विल्बर

एल्मर आणि वारा

एल्मर आणि हरवलेला टेडी



एल्मर आणि अनोळखी पाहुणा मित्र

– अंजली पटवर्धन

या लाडक्या मुलांनो...

या लाडक्या मुलांनो, तुम्ही मला आधार
नवहिंदवी युगाचे तुम्हीच शिल्पकार ।।धृ।।
आईस देव माना, वंदा गुरुजनांना
जगी भावनेहुनि त्या कर्तव्य थोर जाणा
गंगेपरी सदैव ठेवा मनी विचार ।।१।।
शिवबापरी जगात दिलदार शूर व्हावे
टिळकांपरी सदैव ध्येयास त्या पुजावे
जे चांगले जगी या, त्याचा करा स्वीकार ।।२।।
शाळेत रोज जाता, ते ज्ञानबिंदू मिळवा
हृदयात आपुल्या त्या देशाभिमान ठेवा
कुलशील छान राखा, ठेवू नका विकार ।।३।।

बालांसाठी जी बालगीतं ध्वनिमुद्रित झाली ती कल्पनारम्य, मुलांच्या मनातील बालसुलभ भावना व्यक्त करणारी, गोष्टीरूप होती; पण मधुकर जोशी यांनी लिहिलेलं 'या लाडक्या मुलांनो...' हे गीत मुलांनी 'आदर्श' कसं बनावं याचं मार्गदर्शन करणारं आहे. भारतमातेने मुलांना केलेलं हे आवाहन आहे. पहिल्याच ओळींत ही भारतमाता

मुलांना सांगते, की तुम्ही माझे आधारस्तंभ आहात आणि नव्या युगाचे शिल्पकारही आहात. हे आधारस्तंभ पुढे जाऊन जेव्हा आदर्श बनतात तेव्हाच ते मातृभूमीचं ऋण फेडू शकतात आणि एक नवीन युग निर्माण करू शकतात. आदर्श म्हणजे काय, तर आपलं व्यक्तिमत्त्व चांगल्या पद्धतीने घडवणे. तर असं चांगलं व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी काय केलं पाहिजे, हे मधुकर जोशींनी या गीतातून सांगितलं आहे. ते सांगतात - आईला देव माना. गुरुजनांना वंदन करा. थोडक्यात, आई आणि गुरुजन यांच्याबद्दल तुमच्या मनात खूप आदराची, कृतज्ञतेची आणि प्रेमाची भावना असली पाहिजे. जेव्हा गरज असेल तेव्हा भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानलं पाहिजे. तुमच्या मनात सदैव गंगेसारखे पवित्र आणि निर्मळ विचार असले पाहिजेत.

शिवाजी महाराजांचं प्रेरणादायी चरित्र मुलांना इतिहासामुळे माहिती असतं. तर शिवाजी महाराजांसारखे दिलदार (मोठ्या मनाचे) आणि शूर (धाडसी) व्हा, लोकमान्य टिळकांनी जसं देशसेवेचं ध्येय बाळगलं होतं आणि त्या ध्येयाचा ध्यास त्यांना लागला होता, तसाच ध्यास तुम्हाला लागला पाहिजे. थोडक्यात, जगात जे काही चांगलं आहे त्याचा स्वीकार करा.

रोज शाळेत जाता, तर शाळेतून ज्ञानाचे बिंदू मिळवून समृद्ध, संपन्न व्हा. आपल्या देशाबद्दल सदैव अभिमान बाळगा. कोणतंही वाईट कृत्य करू नका. चारित्र्यसंपन्न व्हा.

कोणत्याही बाल पिढीसाठी आदर्श ठरावं, असं हे गीत आहे. किंबहुना काळ जसजसा पुढे सरकतो आहे, तसतशी या गीताची किंवा अशा प्रकारच्या गीतांची गरज भासणार आहे. खरं तर हे गीत बालांसाठी असलं तरी त्या गीताप्रमाणे आचरण करणं, ही आजच्या पालकांची जबाबदारी आहे. भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या पालकांनी थांबून या गीतावर चिंतन केलं पाहिजे. आईला आणि गुरुजनांना वंदन करा, असं आम्ही मुलांना सांगत असू, तर वंदनीय होण्याची जबाबदारी आईवर (पालकांवर) आणि गुरुजनांवरही तेवढीच आहे. आपल्या मुलाला आणि विद्यार्थ्याला स्पर्धेत धावणारा घोडा न बनवता, तो एक चांगला

नागरिक आणि चांगला माणूस कसा बनेल, या पद्धतीने त्याच्यावर संस्कार करण्याची जबाबदारी पालकांची आणि गुरुजनांची आहे, हेही या गीतातून सूचित होतं.

मुलांचं मन संस्कारक्षम असतानाच सद्‌वर्तनाचे धडे त्यांना मिळाले तर ते मातृभूमीचे आधारस्तंभ बनू शकतात, म्हणून या गीतातून काही चांगल्या गोष्टी मुलांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न केला आहे.

दोस्ती

मधुमती शिंदे

किंमत : १३०/- रु. / पोस्टेज : ५०/-रु.

कथेतील पात्रांच्या चित्रणातून पशू-पक्ष्यांच्या भावनांचा माणसांच्या स्वभावाशी मिळताजुळता वेध घेतला आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून साथ केली आहे. आपल्या अवतीभोवती अनेक पशू-पक्षी गुण्यागोविंदाने बागडताना दिसतात, पण उपद्रवी मनुष्यच त्यांचे जगणे-बागडणे एका क्षणात नष्ट करतो. पक्ष्यांच्या सवयी आणि शरीराची रचना यावर त्याचे निवासस्थान अवलंबून असते. जसे, चिमणी धिटाईने वाळत घातलेले धान्य टिपते, कावळा मनुष्यवस्तीजवळच बिनधास्तपणे राहतो. प्रत्येक पशू-पक्ष्याच्या वागणुकीची एक तऱ्हा, एक लकब असते, असे या पुस्तकातून दिसून येते. या कथांमधून प्राण्यांची जगण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी चाललेली धडपड आणि कधी कधी हतबल होऊन जीवनासाठी चाललेला संघर्ष दिसून येतो. मुलांना पशू-पक्ष्यांविषयी जिज्ञासा, प्रेम वाटायला लावणारे हे पुस्तक आहे.

विक्रम-वेताळ मालिका

वैशाली कार्लेकर

खरं बक्षीस
आणि इतर कथा

विक्रमादित्य हा एक धाडसी आणि बुद्धिमान राजा, तर स्मशानातला वेताळ भीती दाखवणारा पण मिश्कील स्वभावाचा!

गुप्त खजिना
आणि इतर कथा

जादूची सावली
आणि इतर कथा

प्रत्येकी किंमत ५० रु.
पोस्टेज खर्च ५० रु.

टेकडीवरचं देऊळ
आणि इतर कथा

समुद्रातली अप्सरा
आणि इतर कथा

जादूचा रत्नहार
आणि इतर कथा

राजपुत्राचा निर्णय
आणि इतर कथा

ज्योतिषाचं नशीब
आणि इतर कथा

पुतळे जिंवत झाले
आणि इतर कथा

दैवी सिंहासन
आणि इतर कथा

– प्रज्ञा कुलकर्णी

आपली सृष्टी

मुलांनो, सांगते तुम्हाला
पर्यावरणाच्या चार गोष्टी
कसा असतो आपला निसर्ग
कशी काम करते सारी सृष्टी

पर्यावरण म्हणजे आपल्या
भोवतीचा सारा परिसर
पाहण्यासाठी तो काढा जरा
तुमच्या व्यस्त दिनक्रमातून थोडा अवसर

झाडेवेली, प्राणी, पक्षी
पहा जरा निरखून
थोडेसे त्यांचे निरीक्षण कराल तर
जाल तुम्ही हरखून

कसे उगवती सूर्य, चंद्र, तारे
कसे चालते विश्वाचे हे चक्र सारे
आपल्या अवतीभवती पहा जरा रे
हा निसर्ग पाहताच होतील तुमचे चेहरे हसरे

जाणून घ्या सारे विश्वाच्या पर्यावरणाचे
मोल आणि रहस्य
तेव्हाच तुमचे जीवन होईल
सुंदर, समृद्ध आणि सुसह्य

जातक कथा

निर्मला मोने

मनोरंजनातून संस्कार करणाऱ्या या जातक कथा...



मनोरंजक जातक गोष्टी

बोधप्रद जातक गोष्टी

एकत्रित संच किंमत २४० रु.
पोस्टेज खर्च ५० रु.

प्रेरक जातक गोष्टी

शिक्षाप्रद जातक कथा

मजेदार लोककथा

मातृभूमी

एकदा एक रशियन व्यापारी फिरत फिरत हिंदुस्तानात गेला. तिथल्या सम्राटाला त्यानं भेट म्हणून एक विलक्षण सुंदर पक्षी दिला. तो पक्षी इतका सुरेख गाणी म्हणायचा की ऐकणारा त्यात हरवून जायचा अगदी.

सम्राटाला तो पक्षी इतका आवडला की त्यानं खास त्या पक्षासाठी एक सोन्याचा रत्नजडित पिंजरा बनवून घेतला आणि पक्ष्याला त्यात ठेवून दिलं. त्या पिंजऱ्यात त्यानं हंस पक्षाच्या पिसांचा मऊ बिछाना घातला. त्या पक्ष्यासाठी सम्राटाचा प्रमुख आचारी सुंदरसे स्वादिष्ट पदार्थ करून पाठवायचा.

राजाची इच्छा होती की त्या पक्ष्याने इथे इतक्या आनंदात रहावं की त्याचं गाणं आणखी फुलेल.

पण कुठलं काय! तो पक्षी एकदम गप्पच होऊन गेला. सम्राट रोज त्याचं गाण ऐकायला मोठ्या उत्कंठेनं यायचा. पण हा पक्षी काही चोच उघडेना.

सम्राटानं विचार केला की या पक्ष्याला मोकळ्या हवेची सवय आहे, म्हणून

त्याला उदास वाटत असेल कदाचित. म्हणून त्यानं त्याचा पिंजरा राजउद्यानात टांगला. हे उद्यान म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्गच होता अक्षरश:. पण तरीही हा पक्षी चुप होता.

आता काय करावं बरं! मग राजानं त्याचा पिंजरा वनातल्या एका झाडाला टांगण्याचा आदेश दिला. पण पक्ष्याची कळी काही खुलेना. विद्वान पंडितांना विचारून त्यानं खूप उपाय करून पाहिले. पण छे, कसलं काय नि कसलं काय!

एक दिवस एक परदेशी विद्वान त्याच्या बंदिशाळेत होता, त्यानं सुचवलं की याला सगळ्या देशांमध्ये फिरवून आणा. कुठंतरी तो गायला लागेल.

राजानं हा उपाय करून बघायचं ठरवलं. त्यानं त्या कैद्याला आश्वासन दिलं की तुझ्या सांगण्याचा फायदा झाला तर तुला मुक्त करण्यात येईल.

तीन वर्षं पक्ष्याचा पिंजरा घेऊन सम्राट स्वत: देशविदेशात फिरला. अखेरीस रशियन प्रदेशात एकदा फिरत असताना एका दलदलीच्या साधारण जागेजवळ ते येऊन थांबले. रात्र होत आली होती. म्हणून तिथेच थांबायचं ठरलं. या पक्ष्याचा पिंजरा एका वाळक्या झाडाच्या फांदीला टांगण्यात आला. त्याच्याजवळ एका रखवालदाराला ठेवून बाकी सगळे झोपी गेले.

पहाट व्हायला लागल्यावर एकाएकी त्या पक्ष्यानं आपले पंख फडफडवले आणि तो चोचीनं पंख साफ करायला लागला.

हे बघून रखवालदारानं सम्राटाला उठवलं. आज पक्षी खुशीत दिसत

होता. सम्राटानं चारी बाजूला नजर फिरवली. सगळीकडे नुसती दलदल होती. मरतुकडी झाडं, पिवळट वाळू, घाणेरडा वास आणि डासांच्या झुंडीच्या झुंडी होत्या तिथे. ते बघून सम्राटाला कसंसच झालं. पण पक्षी तर आनंदानं इकडे-तिकडे बघत होता.

सूर्य उगवला आणि त्याची किरणं सगळीकडे पसरली. पक्षी आनंदानं उडून पुढे झेपावला. पण पिंजऱ्याशी टक्कर होऊन खाली पडला. मग त्यानं उदासपणे एक गाणं म्हणायला सुरुवात केली. त्याबरोबर हुबेहूब त्याच्यासारखेच हजारो पक्षी तिथे झेपावत आले आणि पिंजऱ्याभोवती घिरट्या घालू लागले. आणि त्याच्या उदास स्वरात त्यांनीही आपले स्वर मिसळले.

सम्राट विचारमग्न झाला. म्हणाला, ''अरेच्चा हा पक्षी, इथलाच आहे म्हणजे. ही याची मातृभूमी दिसतेय.'' असं म्हणत असताना राजाला आपला देश आठवला. हिंदुस्तान सोडून तीन वर्षं झाली होती. त्या आठवणीनं सम्राट व्याकुळ झाला. डोळ्यात अश्रू आले. त्यानं आदेश दिला, ''पक्ष्याला सोडून द्या पिंजरा उघडून.'' त्या पक्ष्याला सोडताच त्यानं आनंदानं आपल्या मातृभूमीबद्दल आणि स्वातंत्र्याची हजारो गाणी गायली. मातृभूमीचे गुणगान गात सम्राट परतीच्या प्रवासाला निघाला.

– मंजूषा आमडेकर
मेहता पब्लिशिंग हाऊस

वैशाली कार्लेकर / निर्मला मोने / अरुंधती महाम्बरे

जंगल जंमत मालिका

पोस्टेज खर्च ५० रु.

किंमत ६० रु.

जांभळे आंबे
आणि जंमत गोष्टी



किंमत ६० रु.

फट्फजिती
आणि जंमत गोष्टी

किंमत ३० रु.

सोनेरी चोच
आणि जंमत गोष्टी

किंमत ३० रु.

पिंटू पेलिकन
आणि जंमत गोष्टी

किंमत ३० रु.

तल्लख मोती
आणि जंमत गोष्टी

किंमत ३० रु.

उंटाची मान
आणि जंमत गोष्टी

किंमत ३० रु.

लालतोंडी चोर
आणि जंमत गोष्टी

किंमत ६० रु.

गाढवाचं गाणं
आणि जंमत गोष्टी

किंमत ३० रु.

सिंहाचं उड्डाण
आणि जंमत गोष्टी

किंमत ५० रु.

तीन छोटे मासे
आणि जंमत गोष्टी



किंमत ५० रु.

बूम बूम बैल
आणि जंमत गोष्टी

चालणारे बूट

आणि मजेदार गोष्टी

तीन मित्रांची फजिती

"जोशीकाकांच्या बागेतले पेरू चांगले पिकलेत हे तुम्हाला माहितीय का?" रोहन म्हणाला.

"हो? मला नव्हतं माहीत. पिकले असतील तर आपण जाऊन थोडे घेऊन येऊ." कुणाल म्हणाला.

"चालेल. पण केव्हा? जोशीकाका नसतील अशी कोणती वेळ आहे का? कारण त्यांचं फार लक्ष असतं. आणि मला त्यांच्या तावडीत सापडायचं नाहीये." प्रतीक म्हणाला.

"ते शहरात त्यांच्या भावाच्या फळाच्या दुकानात बसायला गेलेत. त्यामुळे आपण आज संध्याकाळी गेलो तर जास्त बरं होईल. ते साडेपाचपर्यंत दुकान बंद करत नाहीत. आणि त्यानंतर ते नेहमी साफसफाई करतात." रोहन म्हणाला.

"बरोबर आहे. मग बरोबर पाच वाजता जोशीकाकांच्या फळबागेच्या दारात भेटूया. जोशीकाका यायच्या आत, बागेत जाऊन, झाडावर चढून फळं काढायला आपल्याला चिक्कार वेळ मिळेल." कुणाल म्हणाला.

"आहा! मस्त पिकलेले पेरू! मी माझे सगळे खिसे पेरूंनी भरून घेईन!" प्रतीक म्हणाला.

मग ती तिन्ही मुलं बागेच्या बाहेर भेटली. जोशीकाकांचं घर रिकामं आणि बंद दिसत होतं. आजूबाजूलाही कोणी दिसत नव्हतं. बाग गावाबाहेर असल्यामुळे कोणीही तिकडे यायची शक्यता नव्हती.

"आपण गेटवरून उडी मारून जाऊ." प्रतीक म्हणाला आणि ते तिघेही गेटवरून उडी मारून गेले.

फळबाग फार मोठी नव्हती. तिच्या सर्व बाजूंना कुंपण होतं. मुलांनी पिकलेल्या पिवळ्या पेरूंच्या जागा हेरल्या. आणि ते तिघेजण झाडांवर चढले. ते पेरू फारच सुंदर दिसत होते. तेवढ्यात एका पेरूच्या झाडामागच्या झुडपात काहीतरी खसफस ऐकू आली. मुलं थांबली. झुडपामागे काहीतरी हालचाल झाली आणि कोणीतरी मुलांसमोर येऊन उभं राहिलं.

''हं! फक्त एक बोकड! तो काय करतोय आपल्याला, जाऊया.'' रोहन म्हणाला. पण तेवढ्यात दुसरा बोकड आला, तिसरा बोकड आला आणि चौथाही आला. ते बोकड मुलांकडे बघतच राहिले. नंतर पहिला बोकड मुलांवर धावून गेला आणि त्यांना दुशा देण्यासाठी डोकं खाली करून उभा राहिला.

''लवकर चढा.'' प्रतीक ओरडला. ते पटकन् झाडाच्या वरच्या भागात गेले. चारही बोकड झाडाभोवती जमले आणि वरती बघतच राहिले. एका बोकडाने 'बें, बें' असा जोरात आवाज काढला.

''हे जोशीकाकांना हाक तर मारत नसतील ना? गप्प बसा मूर्ख बोकडांनो!'' प्रतीक अस्वस्थ होऊन म्हणाला.

''चालते व्हा इथून.'' रोहन आपण इतरांपेक्षा जास्त शूर आहोत हे दाखवण्यासाठी म्हणाला. आता तो झाडाच्या वरच्या भागात पोहोचला होता. पण बोकड तिथून कुठेही गेले नाहीत. ते त्या तिघांकडे बघत पेरूच्या झाडाभोवतीच फिरत राहिले.

''मी काय म्हणतो, चर्चच्या घड्याळात आत्ताच साडेपाचचे ठोके पडल्याचे मी ऐकले. जोशीकाका आता येतीलच. मला वाटतं, हे बोकड त्या झुडपांमध्ये परत जातील तर बरं होईल.'' कुणाल जरा वेळानं म्हणाला.

पुढच्या पाच मिनिटांत बोकड इकडे-तिकडे फिरायला लागले. मुलांनी झाडावरून एकदम खाली उड्या मारल्या. पण आता त्यांचं अंग जड झालं

होतं. कारण त्यांच्या पोटात आता पेरू गेले होते.

''आणि आता पळा.'' प्रतीक म्हणाला आणि ते पळाले.

पण अर्थातच त्यांच्यामागून बोकडही पळाले. त्यांनी मुलांना पाठीमागून धडाधड ढुशा मारल्या. आणि मुलं बाहेर पडेपर्यंत त्यांना पार सतावून टाकलं.

''आई गं! ओय, ओय!!'' मुलं पळून जाता जाता ओरडत होती. रोहन कसाबसा गेटपर्यंत पोहोचला आणि उडी मारून बाहेर पडू शकला. प्रतीकला संपूर्ण बागेत बोकडांच्या ढुशा खात पळावं लागलं तेव्हाच स्वत:ची सुटका करून घेता आली. पण कुणाल कुंपणाच्या काटेरी भागात गेला आणि त्यामुळे त्याच्या शर्टाला मोठं भोक पडलं.

ते गल्लीतून पळून जात असतानाच त्यांची जोशीकाकांशी टक्कर झाली. तेवढ्यात रोहनच्या खिशातून काही पेरू पडले आणि रस्त्यावरून घरंगळत खाली गेले.

''अच्छा! म्हणजे तुम्ही माझ्या बागेतले पेरू चोरत होतात तर! चोर कुठले! थांबा, मी म्हणतो, थांबा!'' जोशीकाका जोरजोरात ओरडले. पण मुलं बिलकूल थांबली नाहीत.

धावतधावत ती दिसे-नाशी झाली. त्यांना इतका सडकून मार बसला होता की त्यांना अजिबात बसता येत नव्हतं.

त्या रात्री ते तिघेही आजारी पडले. कारण त्यांनी खाल्लेल्या पेरूंपैकी काही पेरू कच्चे होते. पण दुसऱ्या दिवशी तशाच अवस्थेत त्यांना शाळेत जावं लागलं. कारण ते ज्या अवतारात घरी गेले होते त्यावरून त्यांच्या आया त्यांच्यावर चिडल्या होत्या.

शाळेत गेल्यानंतर जोशीकाकांकडची खबर शाळेतही पोहोचली आहे हे त्यांच्या लक्षात आलं. कारण जोशीकाकांनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडेच तक्रार केली होती.

''तुमच्यापैकी कोणी पेरू चोरले? तुम्ही स्वत:हून कबूल करा. मी तुम्हाला

पुन्हा पुन्हा बजावतोय की स्वत:हून कबूल करा. कारण तुम्ही कबूल केलं नाहीत तरी खरे चोर कोण आहेत ते मला कळणारच आहे.'' मुख्याध्यापक कडक आवाजात म्हणाले. त्यांनी सगळ्याच मुलांना एका रांगेत उभं केल होतं.

रोहन, कुणाल आणि प्रतीक काहीच बोलले नाहीत. त्यांना माहीत होतं की जोशीकाका त्यांना ओळखत नव्हते. मग मुख्याध्यापक तरी कसे ओळखणार?

''खाली बसा.'' मुख्याध्यापक अचानक म्हणाले. सगळी मुलं पटकन् खाली बसली. पण रोहन, कुणाल आणि प्रतीक या तिघांनाही पटकन् खाली बसता येईना. मुख्याध्यापक हे बघतच होते.

''रोहन, कुणाल आणि प्रतीक इकडे या. तुम्हीच चोर आहात. तुम्ही चोरलेल्या पेरूचे पैसे तुम्ही जोशीकाकांना दिले पाहिजेत.'' मुख्याध्यापक म्हणाले.

''प... प... पण सर, ते आम्हीच होतो हे तुम्ही कसं ओळखलं?'' प्रतीक अडखळत म्हणाला. त्याला फारच आश्चर्य वाटलं होतं.

''कारण जोशीकाका म्हणाले की त्यांनी त्यांच्या बागेत फळं चोरायला येणाऱ्यांसाठी बोकड ठेवले आहेत. आणि मी जेव्हा तुम्हाला सगळ्यांना खाली बसायला सांगितलं तेव्हा तुम्हाला खाली बसताना फारच प्रयत्न करावे लागले. त्यावरूनच मी ओळखलं की तुम्ही तिघेच खरे चोर आहात. आणि मला वाटतं तुम्ही खाल्लेले पेरू फारच चांगले होते.'' मुख्याध्यापक म्हणाले.

''नाही सर, ते मुळीच चांगले नव्हते. आम्ही बोकडांच्या जबरदस्त ढुशा खाल्ल्या, रात्रभर आजारी पडलो. शिवाय आता आम्हाला जोशीकाकांना पैसेही द्यावे लागणार. त्यापेक्षा आम्ही ते पेरू जोशीकाकांकडून विकतच घेतले असते तर बरं झालं असतं. सर, प्लीज हसू नका.'' रोहन म्हणाला.

पण सगळ्यांना त्यांचं फारच हसू येत होतं. विशेषत: ते तिघं खाली बसायला लागले की सगळेजण खो खो हसायला लागायचे. बिच्चारे रोहन, कुणाल आणि प्रतीक त्यांना असं वाटतं की ते कधीही पेरू खाऊ शकणार नाहीत.

– संस्मिता गुप्ते

मेहता पब्लिशिंग हाऊस

ज्योतिषाचं नशीब
आणि
इतर कथा

ज्योतिषाचं नशीब

त्या रात्री स्मशानात मिट्ट काळोख पसरला होता. कधी फिदिफिदि हसण्याचा आवाज, तर कधी किंकाळ्यांनी तो परिसर दणाणून जात होता. एखाद्या शूरवीरालाही भीतीनं घाम फुटावा अशा त्या वातावरणात राजा विक्रम मात्र निधड्या छातीनं एकेक पाऊल पुढे टाकत होता. नेहमीच्याच जुनाट झाडावर उलट्या लटकणाऱ्या वेताळाला खांद्यावर टाकून तो परतीची वाट चालू लागला.

चकित होऊन वेताळ म्हणाला, ''राजा, पुन्हापुन्हा हे अवघड काम तू का करतो आहेस? जर काही न बोलता तू मला नेणार असलास, तरच मी येईन. नाहीतर निघून जाईन हे तुला चांगलंच माहीत आहे.''

राजानं होकारादाखल मान हलवली आणि तो चालू लागला. वेताळानं नवी गोष्ट सांगायला सुरुवात केली.

सीतापूरमध्ये भास्कर नावाचा एक सुस्वभावी तरुण राहत होता. त्याच्या चांगल्या वर्तवणुकीमुळे प्रभावित होऊन त्याच गावातल्या एका गृहस्थानं आपल्या मुलीशी लग्न करण्याचा प्रस्ताव त्याच्यापुढे ठेवला. परंतु तोपर्यंत भास्करला नोकरी मिळालेली नव्हती. उत्पन्नाचं काहीच साधन नसल्यामुळे त्यानं लग्नाला नकार दिला. त्या गृहस्थानं मात्र भास्करला आपला जावई करून घेण्याचा चंगच बांधला होता. त्यानं श्रीधर नावाच्या प्रसिद्ध ज्योतिषाला भास्कर आणि मुलगी संध्या यांची पत्रिका दाखवली. संध्याशी लग्न झाल्यावर जर भास्कर जवळच्या माणिकपूर या शहरात गेला तर तिथे

त्याला उत्पन्नाचं साधन नक्की मिळेल असं भविष्य श्रीधरनं सांगितलं. ते ऐकून संध्याचे वडील भास्करच्या वडिलांना भेटायला आले. ज्योतिषी श्रीधरनं सांगितलेलं भविष्य ऐकून भास्करचे वडीलही त्या दोघांचा विवाह करून द्यायला तयार झाले. अखेर वडिलधाऱ्या माणसांच्या आग्रहानं भास्करही विवाहाला तयार झाला.

दोघांचा विवाह पार पडला. विवाहानंतर भास्कर पत्नीसह माणिकपूरला आला. राहायच्या जागेचा प्रश्न होता. जवळ फारसे पैसे नसल्यामुळे जागा मिळत नव्हती. फिरता–फिरता त्याला एका मोठ्या सावकाराचा बंगला दिसला. त्यानं त्या सावकाराला राहायला एखादी खोली देण्याची विनंती केली. नोकरी मिळाली की लगेच मी पुढच्या दोन्ही महिन्यांचंही भाडं देईन असं त्यानं सांगितलं. सावकार दयाळू होता. तो म्हणाला, ''मी तुला राहायला जागा देईन पण एका अटीवर राम, श्याम, नरेंद्र आणि किरण असे चारजण माझे देणेकरी आहेत. या चौघांकडे माझी खूप रक्कम अडकलेली आहे. यापैकी कोण मला आजच्या आज रक्कम परत करु शकेल हे तू सांगायचं. जर तसं घडलं तरच मी तुला राहायला जागा देईन.'' सावकाराची अट ऐकून भास्कर विचारात पडला. या चौघांना तो ओळखतही नव्हता पण काहीतरी उत्तर देणं भाग होतं. त्यानं नरेंद्र असं उत्तर दिलं. त्याप्रमाणे सावकार नरेंद्रकडे गेला. सावकार येताच नरेंद्रनं त्याचं स्वागत करून सर्व रक्कम त्याला परत केली. खूप दिवस रेंगाळलेली वसुली झाल्यामुळे सावकार खूष झाला आणि त्यानं भास्करला राहायला जागा दिली.

या घटनेमुळे भास्करच्या आयुष्याला एक वेगळंच वळण दिलं. सावकार अनेक महत्त्वाच्या कामांसाठी भास्करचा सल्ला घेऊ लागला. हळूहळू भास्करला भविष्यातल्या घटना कळतात, महत्त्वाची कामं त्याच्या सल्ल्यानं पार पडतात. ही बातमी शहरभर पसरली. अनेक लोक त्याचा सल्ला घ्यायला, भविष्य विचारायला येऊ लागले. त्यातून त्याला चांगली अर्थप्राप्ती होऊ लागली. आपल्याला भविष्यकथन येत नाही हे भास्करला माहीत होतं.

पण सारासार विचार करून किंवा कधीकधी अंदाजे सांगूनही आपलं म्हणणं खरं ठरतं हे त्याला माहीत होतं. केवळ नशिबाची साथ असल्यामुळेच हे घडत आहे हेही तो ओळखून होता. त्यामुळेच उद्या नशिब फिरलं तर आपलं भविष्यकथन खोटं ठरायला वेळ लागणार नाही. या विचारानं एखादा दुसरा व्यवसाय सुरू करण्याचा तो विचार करू लागला. संध्याला मात्र आपला पती भविष्यकथनात निष्णात आहे असंच वाटत होतं. भास्करनं तिला कितीही समजावलं तरी तिला ते खरं वाटत नव्हतं.

एक दिवस सीतापूरचे प्रसिद्ध ज्योतिषी श्रीधर स्वत: भास्करच्या घरी आले. भास्करच्या भविष्यकथनाचं त्यांनी तोंडभरून कौतुक केलं. त्यांनीच भास्करची पत्रिका पाहून त्याला माणिकपूरला जाण्याचं सुचवलं होतं हे त्यांना आठवत होतं. भास्करनंही त्यांचं प्रेमानं स्वागत केलं. ज्योतिषी श्रीधर यांनी त्यांच्या भेटीचा हेतू स्पष्ट केला. ते म्हणाले, ''मला तुझ्या सल्ल्याची गरज आहे म्हणून मी तुला भेटायला आलो आहे. सीतापूरमधल्या लक्ष्मण या शेतकऱ्याची पाच एकर जमीन त्याला विकायची आहे. त्या जमिनीची किंमत ५०० सोन्याच्या मोहोरा इतकीच आहे पण मला तो १००० सोन्याच्या मोहरा देण्याचा आग्रह धरत आहे.'' ''पण त्यानं एवढी जास्त किंमत मागण्याचं कारण काय?'' भास्करनं विचारलं. ''ती एक मोठी हकीकत आहे.'' ज्योतिषी श्रीधर सांगू लागले. ''काही दिवसांपूर्वी लक्ष्मणची परिस्थिती खूप हलाखीची होती. त्यावेळी तो माझ्याकडे भविष्य विचारायला आला होता. मी त्याला सांगितलं की यावर्षी शेतात चांगलं पीक येईल आणि तुझं सर्व कर्ज फिटेल. मुलालाही चांगली नोकरी लागेल आणि तुझ्या जमिनीत तुला गुप्तधनही सापडेल. माझी सर्व भविष्यवाणी खरी ठरली पण फक्त गुप्तधन मात्र सापडलं नाही. लक्ष्मणला आता जमीन विकून शहरात जायचं आहे. त्याचं म्हणणं आहे की जर माझं भविष्य खरं असेल तर या जमिनीची किंमत खूप जास्त यायला हवी, निदान १००० मोहरा तरी मिळाव्या असं त्याला वाटत आहे. मी

जमीन विकत घेतली नाही तर तो इतरांना गुप्तधनाचं भविष्य सांगून तीच जमीन खूप जास्त किंमतीला विकणार आहे. याबाबत काय करावं हे विचारायला मी इथं आलो आहे.''

ज्योतिषी श्रीधर यांचं म्हणणं ऐकून भास्करला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, ''पंडितजी आपण तर खूप मोठे भविष्यकार आहात आणि मला तर भविष्यातलं काही कळत नाही. अशा वेळी मी आपल्याला काय सांगू?''

''पण बेटा तू उच्चारलेली भविष्यवाणी खरी होते यावर माझा पूर्ण विश्वास आहे त्यामुळे तुझ्या सल्ल्याप्रमाणेच मी निर्णय घेणार आहे.'' ज्योतिषी श्रीधर हसत म्हणाले. भास्करची पंचाईत झाली. त्याला काहीतरी उत्तर देणं भाग होतं. शेवटी त्यांना ती जमीन १००० मोहरा देऊन विकत घ्यावी असं सुचवलं. भास्करचा निरोप घेऊन श्रीधर सीतापूरला परत गेले.

भास्करची पत्नी संध्या या दोघांचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होती. तिच्या डोक्यात एक वेगळीच योजना आली. ती भास्करला म्हणाली, ''जर त्या जमिनीत गुप्तधन असेल तर आपणच ती जमीन श्रीधर यांच्याकडून विकत घेऊया. म्हणजे आपण खूप श्रीमंत होऊ. पण त्यासाठी किमान ५००० सोन्याच्या मोहरा तरी हव्या.'' भास्कर म्हणाला, ''मग त्यासाठी आपण भविष्यकथन सोडून राजधानीत जाऊन एखादा व्यवसाय करून पैसे जमवू.'' संध्याची ही कल्पना भास्करला पसंत पडली.

लवकरच त्यांनी राजधानीत जाऊन दुसरा व्यवसाय सुरू केला. काही काळातच व्यवसायात चांगली भरभराट झाली आणि त्यांच्याकडे ५००० सोन्याच्या मोहरा जमा झाल्या. लवकरच त्या मोहरा घेऊन भास्कर आपल्या गावात म्हणजे सीतापूरला आला. त्याला भेटून वडिलांना खूप आनंद झाला. ते म्हणाले, ''आज सर्व गावकऱ्यांना ज्योतिषी श्रीधर यांच्याकडे भोजनासाठी निमंत्रण आहे. नुकताच त्यांना जमिनीमध्ये मोठा गुप्तधनाचा हंडा सापडला. एक हजार मोहरा देऊन विकत घेतलेल्या जमिनीत पन्नास हजार सोन्याच्या

मोहरा मिळाल्या या नशिबाला काय म्हणावं? नक्कीच त्यांना भविष्यकथनाच्या अभ्यासातून याचे संकेत मिळाले असणार.''

ही बातमी ऐकताच भास्कर एकदम गप्प झाला. आता आपला व्यवसाय पुढे चालू ठेवावा की पुन्हा भविष्यकथनाला सुरुवात करावी या विचारानं तो गोंधळून गेला.

इथपर्यंतची गोष्ट सांगून वेताळ राजा विक्रमला म्हणाला, ''राजा, ज्योतिषी श्रीधर तर नामांकित ज्योतिषी होते. मग त्यांनी भास्करसारख्या नवशिक्या ज्योतिषाचा सल्ला का घेतला? आणि भास्करचा विचार केला तर त्याचा भविष्यकथनाचा कोणताही अभ्यास नव्हता, तरीही त्याचं भाकित बरोबर कसं ठरायचं? जर तुला माहीत असतानाही तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकलं होऊन तुझ्याच पायावर पडतील हे मात्र लक्षात ठेव.''

वेताळाचा प्रश्न ऐकून राजा विक्रम म्हणाला, ''हुषार माणसं नेहमीच सावध आणि विचारी असतात. एखादा निष्णात वैद्यसुद्धा स्वत:वर किंवा कुटुंबातल्या कोणावर उपचार करण्यासाठी दुसऱ्या वैद्याच्या निदानाचा आधार घेतात. त्याप्रमाणेच एखाद्या नामांकित ज्योतिषानं स्वत:विषयीच्या महत्त्वाच्या निर्णयात दुसऱ्या प्रसिद्ध ज्योतिषाचा सल्ला घेणं यात काहीच वावगं वाटत नाही. पंडित श्रीधरनंही हेच केलं. भास्करबाबत सांगायचं तर त्यानं ज्योतिष विद्येचा अभ्यास केला नव्हता हे खरं आहे. पण नशीब त्याच्या बाजूनं असल्यामुळे तो जे बोलेल ते खरं ठरत असे. श्रीधरचा भास्करच्या सल्ल्यावर पूर्ण विश्वास होता म्हणून त्यानं त्याचा सल्ला घेतला.''

राजा विक्रमाचं हे उत्तर ऐकून वेताळानं मान डोलावली. हसून तो म्हणाला, ''अगदी बरोबर, पण तू बोललास म्हणून आता मी परत चाललो... ही... ही... ही...!''

अंधारात झेप घेत क्षणात वेताळ अदृश्य झाला. खांदे झटकून राजा विक्रमानं वेताळ अदृश्य झाला त्या दिशेकडं पाहिलं आणि तो त्याला आणण्यासाठी पुन्हा स्मशानाच्या दिशेनं चालू लागला.

– वैशाली कार्लेकर

मेहता पब्लिशिंग हाऊस

प्रत्येक बाटलीत किती चॉकलेट्स आहेत, मोजा पाहू.





घरटे

मृगजळ

सूर्य डोक्यावर आला, उन्हाच्या झळांनी वृक्ष-वेली मूर्च्छित पडल्या. धरणी सुस्कारे सोडू लागली.

दोन पाडसे तृषाक्रान्त होऊन चोहिकडे वणवण हिंडत होती. पण पाण्याच्या गारव्याचा स्पर्श झालेली वाऱ्याची झुळूक सुद्धा त्यांना कुठे भेटेना.

त्यांनी डोळे ताणून दूर पाहिले, क्षितिजापाशी काही तरी लखलखत होते.

पाणी-पाणीच होते ते ! सूर्याच्या किरणांत ते चमकत होते. क्षितिजावरले त्याचे ते मोहक चंदेरी नृत्यू जणू काही जलदेवता स्वच्छंद तिथे नाचत होती. हरिणशावके क्षितिजाच्या रोखाने धावू लागली.

पहिले बाणाच्या वेगाने पळत सुटले. त्याने मध्येच मान मुरडून वळून पाहिले. दुसरे फार मागे राहिले होते.

पहिले धावता धावता ओरडून म्हणाले, 'वेड्या, असा रेंगाळू नकोस. तुझ्या या गतीनं तू क्षितिजापाशी पोचेपर्यंत ही चंदेरी नदी आटून सुद्धा जाईल ! किती आळशी आहेस तू. ती क्षितिजावर लखलखणारी ही गंगा. मूर्खा, देवाची कृपा आहे ती. ती केव्हा नाहीशी होईल...'

त्याने निरखून पाहिले, दुसऱ्या हरिणाने आपला वेग अद्यापि वाढविला नव्हता.

पहिले पूर्वीपेक्षाही अधिक वेगाने दौडू लागले जणू काही अंतराळातून चमकत जाणारी वीजच.

आकाशाला लागलेला वणवा हळूहळू विझत चालला. राखेच्या ढिगाप्रमाणे दिसणारे काही ढग मावळतीकडे फिरू लागले. पेटलेल्या

वृक्षखंडासारखे भासणारे काही मेघही तिथे दिसत होते. पण त्यांच्यातून निघणाऱ्या ज्वालांत आता दाहकर्ता राहिली नव्हती.

दुसऱ्या हरिणाने समोर पाहिले, क्षितिजाची कडा काळ्या रंगाने सारवल्या-सारखी झाली. आपण रेंगाळत आलो ही पार मोठी चूक केली असे त्याला वाटू लागले.

इतक्यात कुणाच्या तरी कण्हण्याचा आवाज त्याच्या कानावर पडला.

त्याने पुढे येऊन पाहिले. ते दौडत आलेले हरिण उरी फुटून पृथ्वीवर पडले होते. त्याच्या उघड्या तोंडातून रक्तबिंदू ठिबकत होते. ते क्षीण स्वरात उद्‌गारले, 'पाणी, थोडं पाणी !'

दुसऱ्या हरिणाचे डोळे भरून आले.

पहिले हरिण जड स्वरात म्हणाले, 'ऐक नीट, कान देऊन ऐक... पाणी-'

दुसरे हरिण ऐकू लागले. दूर कोठे तरी झरा खळखळत होता. खडकांवरून उड्या मारताना त्या निर्झराच्या पायातल्या वाळ्यांचा किती मंजूळ आवाज होत होता.

ते आनंदाने आपल्या मित्रापाशी जाऊन म्हणाले, 'गड्या ऊठ. जवळच पाणी आहे कुठं तरी. चल, ऊठ वेड्या. इतका वेळ वाऱ्यासारखा धावलास आणि आता-'

पहिल्या हरिणाने काहीच उत्तर दिले नाही. दुसऱ्याने वाकून पाहिले. पहिल्याच्या दृष्टीत शून्यत्व आले होते.

दुसऱ्या हरिणाने व्याकुळ होऊन वर पाहिले. आकाशाच्या महालात पावलापावलाला दीप उजळत होते. आणि त्यांचे स्वागत करण्याकरिता तो झरा मघापेक्षाही मोकळ्या आवाजाने गाऊ लागला होता!

– वि. स. खांडेकर

मेहता पब्लिशिंग हाऊस



विं. दा. करंदीकर

अर्वाचीन मराठी कवितेच्या समृद्ध प्रवाहात बालकवितेला स्वतंत्र तेजभारले अस्तित्व बहाल करणाऱ्या श्रेष्ठ कवींमध्ये विंदा करंदीकर ह्यांचे स्थान अग्रभागी आहे, हे निर्विवाद सत्य आहे. मराठी बालकवितेत विंदांनी एक वेगळाच मानदंड निर्माण केला होता. ह्याचे भान त्यांची समग्र बालकविता वाचल्यावर निश्चितच येते. करंदीकरांनी आपल्या एकूणच बालकवितेतून मुलांच्या मानसिकतेला निश्चितपणे झेपेल असे अद्‌भुत विश्व निर्माण केले. मंगेश पाडगावकर ह्यांनी करंदीकर ह्यांच्या बालकवितेची वैशिष्ट्ये प्रकट करताना म्हटले होते, ''करंदीकरांनी आपल्या बालकवितांमधून आघातानुसार आणि उच्चारानुसार मुक्तछंदाचा तसेच यमकांचा वापर केला. वास्तव आणि काल्पनिक यांचे अद्‌भुततेच्या, गमतीदार, विक्षिप्ततेच्या पातळीवरचे मिश्रण, मुलांच्या भावविश्वाशी उत्स्फूर्तपणे संवाद साधणारी नाट्यात्मकता, अतार्किक पातळीवरून भावसंवाद साधणारी मंत्रसदृश रचना, खेळाची लय पकडणारा बोलभाषेचा उपयोग, मुलांच्या खोडकर वृत्तीतून निर्माण झालेला मिश्कील विनोद, परिकथेच्या अंगाने जाणारी सौंदर्यदृष्टी हे या बालगीतांतून व्यक्त होणारे महत्त्वाचे घटक आहेत.''

सत्य सांगायचे तर विंदांनी अनेक प्रकारच्या बालकविता लिहिल्या आणि मुलांसाठी एक अद्‌भुत वातावरण शब्दांमधून निर्माण केले. अवकाशापर्यंत सहजपणे जाणारी कल्पनेची भरारी तर बालवाचकांचे मन अक्षरश: थरारून टाकते. आश्चर्यालाही आश्चर्य वाटावे एवढी शब्दताक विंदांपाशी होती. 'राणीची बाग' ही त्यांची एक कविता जरी वाचली तरी त्याची प्रचिती येते.

स्वप्नांत पाहिली राणीची बाग;
हत्तीच्या पाठीवर बसला नाग...
हरणांच्या बरोबर खेळत पत्ते;
बसले होते दोन चित्ते...
माकड होते सांगत पुराण;
उंट होता वाचीत कुराण...
सिंह होता व्याख्यान देत;
गाढव होते उतरून घेत...
जिराफ होता गात छान;
मानेइतकीच लांब तान...
कोल्हा होता दुकानदार;
त्याच्या दुधात पाणी फार...
मला पाहताच म्हणाले सारे;
'एक पिंजरा याला द्यारे...
त्या बरोबर आली जाग;
स्वप्नांत पाहिली राणीची बाग...

वॉल्ट डिस्नेच्या 'मिकी माउस' मध्ये जो एक निखळ आनंद आपण प्रत्येक जण आपल्यातले मूल जागे करीत प्रत्यक्ष अनुभवतो, तोच निखळ आनंद विंदांच्या बालकवितांमधून आपण अनुभवतो...विंदांच्या प्रत्येक बालगीतात एक विलक्षण असा अत्यंत प्रज्ञाभरला 'पंच' असतो जो इतर बालकवितांतून क्वचितच अनुभवायला मिळतो. म्हणून

विंदांची बालकविता बालगोपाळांपुरती मर्यादित न राहता, सर्वच काव्यरसिकांना विलक्षण भावते. विंदांच्या बालगीतांना ताल आहे. लय आहे आणि चमत्कृतिजन्य असे विश्वसुद्धा आहे. आपण त्या सहजपणे गुणगुणत म्हणू लागतो.

'परी ग परी, कोण तुझ्या घरी?'
''मनी मांजरी स्वैपाक करी...''
'परी ग परी, कोण तुझ्या घरी?'
''उंदीर खातो श्रीखंड-पुरी...''
'परी ग परी, कोण तुझ्या घरी?'
''पोपट म्हणतो, 'हरी, हरी'...''
'परी ग परी येऊ का घरी?'
''दारात विंचू पहारा करी...''

विंदांच्या बालकविता हा एक स्वतंत्र अभ्यासाचा, तसेच त्यांच्या बालकवितेत ज्या शब्दांच्या गमती-जमती आहेत, त्यांचा वेध घेण्याचा आव्हानात्मक विषय आहे. कार्यकारणभाव शोधण्यात त्यांची कविता गुंग होत नाही, तर्काच्या भिंतीमध्ये ती कविता अडकत नाही, तर मुलांशी मुक्त संवाद करीत, त्यांच्या बालविश्वाशी मजेने खेळत, आपल्याच नादात प्रकट होत राहते.

विठोबाच्या देवळात म्हातारे घड्याळ,
त्याला नाही कसलाच ताळ...
बाराही महिने असतं बंद;
लोक लावतात, त्याला गंध...
पण आरती म्हटली तर
न चुकता होतो गजर...

विंदा आपल्या बालकवितांमधून मजेदार शब्दांशी क्रीडा करीत, लयीचे भान सांभाळीत आणि तालाचा तोलबिंदू सांभाळीत लहान मुलांच्या कल्पनाविश्वाला अक्षरशः झुलवत ठेवतात. मजेदार गमती

करीत, मुलांचे मन खिळवून ठेवतात. नाट्यमय वातावरण सुरेख रंगवत ठेवतात.

खुर्ची म्हणाली, ''अरे स्टुला,
केव्हा येणार चालायला तुला?''
स्टूल म्हणाले, ''त्याच वेळी
जेव्हा हाताने वाजवशील टाळी...''
हे ऐकून पंखा हसला,
पाय नसून फिरत बसला...

विंदा करंदीकर हे प्रयोगशील कवी होते. विंदांच्या बालकविता हा मराठी काव्यविश्वातला एक श्रेष्ठ असा अभिनव प्रयोगच होता. विंदा बालकवितांविषयी आपलं प्रगल्भ मत नोंदवताना म्हणत, ''बालमनाशी जिव्हाळ्याचा संवाद साधणारी कविता म्हणजे बालकविता...''

पंढरपूरच्या वेशीपाशी, एक आहे छोटी शाळा;
सगळी मुलं आहेत गोरी; एक मुलगा कुट्ट काळा...
रोज करतो दंगामस्ती, खोड्या करण्यात आहे अट्टल;
मास्तर म्हणतात, ''करणार काय, न जाणे असेल विठ्ठल...''

विंदांच्या बालकवितेत अर्थभारल्या शब्दांचे, अद्‌भुत असे दर्शन घडते. गमतीदार अनुभवविश्व बालमनाला मंत्रमुग्ध तर करतेच; परंतु प्रौढरसिक वाचक ह्या बालगीतांमधून स्वत:च्या बालपणात कधी रमून जातो हे त्याचे त्यालाच कळत नाही.

विठोबापुढे ठेवून वही
उदयने मागितली त्याची सही...
विठोबा म्हणाला त्याला मजेत
'देवांना नसते लिहायला येत...'

मराठी बालगीतांमध्ये अत्यंत मोलाची भर घालणाऱ्या विंदा करंदीकरांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी झाला आणि १४ मार्च २०१० रोजी विंदांनी अखेरचा आपला कविताभारला श्वास सोडला.

विंदा करंदीकरांना त्यांच्या 'अष्टदर्शने' ह्या कवितासंग्रहासाठी ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केले होते. अंतर्मुख करणारी त्यांची एकूणच कवितासृष्टी रसिकाला थक्क करते. त्यांच्या बालकवितांनी लहान मुलांचे विश्व अक्षरश: जिंकून घेतले होते. मराठी बालकवितेत अनेक ज्येष्ठ कवींनी अतिशय मोलाची भर घातली आहे. मंगेश पाडगावकर, वसंत बापट, कुसुमाग्रज, शांता शेळके, शंकर वैद्य यांच्यासारख्या अनेक श्रेष्ठ कवींनी बालकविता समृद्ध केली. तरीही वाटत राहाते की, ह्या सर्व कवींमध्ये विंदा करंदीकरांची बालकविता ध्रुव ताऱ्यासारखी अढळपद प्राप्त करून गेली. ज्येष्ठ प्रकाशक आणि लेखक रामदास भटकळ यांनी म्हटले आहे की, विंदांनी अनेक प्रकारच्या बालकविता लिहिल्या आहेत. कधी ते तुमच्या आसपासच्या वस्तूंतूनच एक अद्‌भुत वातावरण निर्माण करतात, कधी कल्पनेची भरारी मारून ते तुम्हाला आपल्याबरोबरच एका वेगळ्या मुलखात घेऊन जातात. कधी ते भावनांना झोके देतात, कधी फुटेतो हसवतात, कधी गमतीने चिमटे काढतात. कधी नुसती मस्त मजा करतात...

सोलापूरहून येते काकू; माझ्यासाठी आणते चाकू...
कोल्हापूरहून येते आत्ते; माझ्यासाठी आणते पत्ते...
राजापूरहून मावशी येते; माझा एक पापा घेते...

वयाच्या बाविसाव्या वर्षी विंदांनी आपल्या कविता लेखनाला सुरुवात केली ती 'लाव्हा' नावाच्या कवितेपासून. त्याची सुरुवात होती,

ओततो हृदयी जे लपुनि बसे
जन वदतिल याला खचित पिसे...

आणि १९८१ साली सतत एक्केचाळीस वर्षे कविता लिहिणाऱ्या कवीने आपल्या विलक्षण प्रज्ञेचा निरोप घेतला. प्रतिभेचे आकाश कवेत घेणारे विंदा करंदीकर बालकवितेचे जादूगार होते, हे मात्र निश्चित...

– वामन देशपांडे

आवर्जून वाचावे असे बालसाहित्य

फ्रँकलिन मालिका

आपली सृष्टी मालिका

चित्रमय रंगतदार कथा

बिरबल मालिका

ससोबा-हसोबा मालिका

जंगल जंमत मालिका

बोधकथा

विज्ञान नवलाई मालिका

एल्मर मालिका

विक्रम वेताळ मालिका

तेनालीराम मालिका

आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा

छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी

गुरुशिष्य कथा

चातुर्यकथा

कुमार साहित्य

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 May. 2017. Posting Date : 11 May. 2017.

मेहता पब्लिशिंग हाऊस

आमची नवीन पुस्तके आणि ऑफर्स संबंधित माहितीसाठी संपर्क :

9420 594665,
9422 323039

info@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com

Website: www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com

Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

500 Marathi books Available as e-Book | E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनिल अनिल मेहता हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट २०/१डी /१ अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे ४११ ०११.